CMYK

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : २९१ वा ▶ गुरुवार दि. १७ ऑगस्ट २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

दुसऱ्यांच्या कानपट्टीवर बंदूक ठेवून पक्ष फोडता: राज ठाकरे

मुंबई। दुसऱ्यांच्या कानपट्टीवर बंदूका ठेवायच्या आणि त्यांना भाजप पक्षात घ्यायचे. भाजपने आता दुसऱ्यांचे पक्ष फोडण्यापेक्षा स्वत:चा पक्ष उभारायला शिकावे, अशा शब्दांत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी भाजपवर टिकास्त्र सोडले आहे. पनवेलमध्ये मनसेचा निर्धार मेळावा झाला. दरम्यान, काही दिवसांपूर्वी मनसे नेते अमित ठाकरे यांना नाशिकमध्ये समृद्धी महामार्गावरील टोलनाक्यावर अडवण्यात आले होते. त्यानंतर मनसे कार्यकर्त्यांनी समृद्धी महामार्गावरील टोलनाक्याची तोडफोड केली होती.

न्यूज कॉलम

मुलीची बदनामी करतो म्हणून मारहाण

धुळे । मुलीची बदनामी करतो या कारणावरून तिघांना बेदम मारहाणकरत जखमी केल्याची घटना इसर्डे (ता. साक्री) येथे घडली. या प्रकरण सहा जणांवर गुन्हा दाखल करण्य आला. याबाबत भगत गोविंदा दुर (वय ४३, रा. इसर्डे, पो. छडवेल) यांनी निजामपूर पोलिसांत दिलेल्य तक्रारीनुसार त्यास काशीनाथ कोरडकर, जगन बिरा कोरडकर, हिरा डोंगर कोरडकर, बिरा डोंगर कोरडकर, चिंतामण डोंगर कोरडकर (सर्व रा. रुमकी तलाव, ता. साक्री) व थोंडिराम ब्रिजलाल श्रीराम (रा. इसर्डे) यांनी सळई व काठीने मारहाण केली.

पाण्यात बुडून आठ वर्षांच्या मुलाचा मृत्यू

नाशिक । येथून जवळच असलेल्या जाखोरी गावाजवळील चांदगिरी येथे घरासमोर असलेल्या कडवा कालव्यात पोहण्यासाठी गेलेल्या एका आठ वर्षाच्या बालकाचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, कार्तिक शिवाजी शेलार (वय ८) रा.शेलार गल्ली, चांदगिरी हा मुलगा घराजवळ असताना जवळच असलेल्या कडवा कालव्यामध्ये पोहण्यासाठी गेला होता.

राष्ट्रीय नेत्यांपेक्षा ईडी जास्त निर्णय घेते : शरद पवारांची भाजपवर टीका

मुंबई । प्रतिनिधी

शरद पवारांनी नुकत्याच घेतलेल्या पत्रकार परिषदेत केंद्रीय यंत्रणाच्या कारवाईवरुन भाजपाला टोला लगावला आहे. यावेळी ते म्हणाले की राष्ट्रीय नेत्यांपेक्षा ईडी निर्णय घेते. यावेळी त्यांनी निवडणूक आयोगावाच्या कामावरही प्रश्न उपस्थित केले.

ठाकरे गटाच्या संदर्भात निवडणूक आयोगाने जो निर्णय दिला होता, त्यात केंद्र सरकारने हस्तक्षेप केला होता, असा आरोपही त्यांनी केला. ठाकरे गटासोबत जे चिन्हाबाबत झालं, ते आमच्यासोबतही होऊ शकतं, असंही मत त्यांनी नोंदवलं. त्यांच्या बोलण्यातून केंद्रीय संस्थावरील शरद पवारांनी नुकत्याच घेतलेल्या पत्रकार परिषदेत केंद्रीय यंत्रणाच्या कारवाईवरुन भाजपाला टोला लगावला आहे. यावेळी ते म्हणाले की राष्ट्रीय नेत्यांपेक्षा ईडी निर्णय घेते. यावेळी त्यांनी निवडणूक आयोगावाच्या कामावरही प्रश्न उपस्थित केले.

ठाकरे गटाच्या संदर्भात निवडणूक आयोगाने जो निर्णय दिला होता, त्यात केंद्र सरकारने हस्तक्षेप केला होता, असा आरोपही त्यांनी केला. ठाकरे गटासोबत जे चिन्हाबाबत झालं, ते आमच्यासोबतही होऊ शकतं, असंही मत त्यांनी नोंदवलं. त्यांच्या बोलण्यातून केंद्रीय संस्थावरील अविश्वास स्पष्ट झळकत होता. यावेळी त्यांनी २०२४च्या निवडणूकीचं भाकीतंही वर्तवलं. त्यांनी दावा केला की २०२४मधील निवडणूक भाजपसाठी अनुकूल नाही. अनेक राज्यांमध्ये सरकार पाडून भाजप सत्तेत आलंय, असेही ते म्हणाले.

मणिपूरजवळ चीन आहे, त्यामुळं अधिक काळजी घेण्याची गरज आहे. घडणाऱ्या सर्व गोष्टी देशाच्या दृष्टीने घातक आहेत, ९० दिवसांपासून संघर्ष सुरु आहे. अविश्वास ठरावाच्या दिवशी मणिपूरवर २ मिनिटे बोलले आणि इतर विषयावर २ तास बोलले. प्रधानमंत्र्यांनी मणिपूरमध्ये जावे लोकांना विश्वास द्यावा, हे त्यांना महत्वाचे वाटलं नाही. त्यापेक्षा निवडणुकांच्या तयारीची मीटिंग घेणं त्यांना महत्वाची वाटली. मणिपूरमध्येस्त्रियांची धिंड काढली जाते आणि मोदी सरकार पाहतेय, म्हणून जनमत मोदी सरकार विरोधात करायची इंडियाची भूमिका आहे.

दिल्ली भाषणात त्यांनी या सगळ्यांचा उल्लेख करण्याऐवजी देवेंद्र फडणवीस यांचे मार्गदर्शन घेऊन मी पुन्हा येईल म्हणाले. आता फडणवीस आले मात्र कसे ? ते बघितले त्यामुळं आता हे पुन्हा कसे येतील बघावे लागेल. असो, आम्ही संघर्ष करू आणि मजबुतीने उभे राहू. जनमत तयार करून यांना धडा शिकवू, असे म्हणत शरद पवारांनी मोदींवर टीकास्त्र सोडले.

गेल्या काही दिवसांपासून मी राज्यात फिरतोय. लोक समर्थन करत आहेत, पाठिंबा देत आहेत. सांगोल्यात हजारो लोकांनी माझी गाडी अडवली, अनेक ठिकाणी लोक पुढं येत आहेत. समर्थन करत आहेत, आनंद आहे. बीड सभेनंतर काही दिवसांनंतर पुन्हा बाहेर पडणार आहे, असे पवार म्हणाले. पत्रकार परिषदेत केंद्रीय यंत्रणाच्या कारवाईवरुन भाजपाला टोला लगावला आहे.

माझ्याशी कोण चर्चा करणार?

मला ऑफर देणारे, माझ्याशी कोण चर्चा करणार आहे? जे लोक ज्या पक्षात होते. त्यांच्या संस्थापक कोण, त्यामुळे ही चर्चा वायफळ आहे, असे मला वाटते. अजित पवार आणि माझी कौटुंबिक भेट होती. मी तर उघडपणे गाडीतून त्या ठिकाणाहून गेली. त्यामुळे गुप्तभेटीत कुठलीही राजकीय चर्चा झालेली नाही, असे पवारांनी स्पष्ट केले आहे.

भाजपसोबत गेलेले ते आमचे नाही

जे लोक आमच्यातून सोडून भाजपसोबत गेले. त्यांच्याशी आमचा काही एक संबंध नाही. आमची भूमिका स्पष्ट आहे. आम्ही भाजपविरोधात काम करणार आहे. त्यामुळे चिंता करण्याची गरज नाही. मविआ म्हणून आम्ही निवडणूका लढवणार आहोत. माध्यमांमधील चर्चांना मी महत्त्व देत नाही.

मी पुन्हा येईनवरुन टोला

शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर देवेंद्र फडणवीसांचा दाखला देत आजच्या पत्रकार परिषदेत दोनवेळा टोलेबाजी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्य दिनाच्या भाषणात ईशान्य भारतासंदर्भात बोलण्याऐवजी मी पुन्हा येईन, असं म्हटलं. त्यांनी देवेंद्र फडणवीसांचं मार्गदर्शन घेतलं असावं, असं शरद पवार म्हणाले. पत्रकार परिषद संपवताना देखील शरद पवारांनी पुन्हा नरेंद्र मोदींना टोला लगावताना त्यांनी किती वेळा सांगितले मी पुन्हा येईन मी पुन्हा येईन..त्यांची अवस्था फडणवीसांसारखी होईल, असं म्हटलं.

मी मोदींचं गुणगान गायलं आहे का?

पृथ्वीराज चव्हाण यांनी शरद पवारांनी मोदींविरोधात लढण्याची भूमिका स्पष्ट करून संभ्रम दूर करण्याची मागणी केली. त्याबाबत माध्यम प्रतिनिधींना शदर पवार यांना प्रश्न विचारला असता शरद पवार म्हणाले की, मी माझ्या पत्रकार परिषदेत सुरुवातीलाच मोदींचं गुणगान गायलं आहे का? माझं म्हणणं सर्वांनी ऐकलं आहे. आमची लढाई ही कायम मोदीविरोधातच असणार आहे.

पत्रकार संरक्षण कायद्याची होणार होळी

धुळ्यात विविध संघटनांचे आज आंदोलन

धुळे । प्रतिनिधी

पत्रकारांना संरक्षण मिळावे, यासाठी पत्रकार संरक्षण कायदा अंमलात आल्यानंतरही पत्रकारांवरील हल्ले वाढतच आहेत. जबाबदार लोकप्रतिनिधीं -कडूनही पत्रकारांवर हल्ले होत असल्याने त्या निषेधार्थ पत्रकारांच्या विविध संघटना एकत्रित येऊन आज सकाळी ११ वाजता आंदोलन करणार आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णकृती पुतळ्याजवळ हे आंदोलन होईल. यावेळी पत्रकार संरक्षण कायद्याची होळी करुन निदर्शने केली जाणार आहेत.

या आंदोलनात मराठी पत्रकार परिषद, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती, धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघ, जन ग्रामीण पत्रकार संघ महाराष्ट्र,भारतीय पत्रकार संघ, व्हाइस ऑफ मीडिया ग्रुप, धुळे तालुका ग्रामीण पत्रकार संघ, इलेट्रॉनिक आणि सोशल मीडियाचे सर्व पत्रकार, छायाचित्रकार सहभागी होणार आहेत.पाचोरा जि.जळगाव येथील पत्रकार संदीप महाजन यांना आमदार किशोर पाटील यांनी दिलेल्या अर्वाच्य शिव्या आणि नंतर त्यांच्यावर ध्याड करण्यात आला. या घटनेनंतर मराठी पत्रकार परिषदेची तात्काळ बैठक होवून परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी पाचोर्यातील घटनेची सविस्तर माहिती देऊन सर्व पत्रकार संघटनांनी एकत्र येण्याचे आवाहन केले. त्यानुसार राज्यातील बहुतांशी पत्रकार संघटना एकत्र आल्या १७ ऑगस्ट रोजी राज्यभर निदर्शने करण्याचे ठरले.

पत्रकारांचे संरक्षण करण्यास निष्प्रभ ठरलेल्या पत्रकार संरक्षण कायद्याची होळी करण्याचा निर्णय घेण्यात आला.महाराष्ट्रात पत्रकार संरक्षण कायदा असला तरी त्याची अंमलबजावणी होत नसल्याने पत्रकारांवरील हल्ल्याच्या घटना वाढल्या आहेत. राज्यात गेल्या वर्षभरात ४६ पत्रकारांवर हल्ले झाले आहेत. पोलीस पत्रकार संरक्षण कायद्यानुसार गुन्हे दाखल करायलाही टाळाटाळ करत असल्याने हा कायदा सर्वार्थाने कुचकामी ठरत आहे. यामुळेच पत्रकार संरक्षण कायदयाची होळी करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.प्रिंट आणि इलेट्रॉनिक माध्यमातील सर्व पत्रकार आणि छायाचित्रकार बंधूनी या आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन विविध संघटना पदाधिकार्यांनी केले आहे.

चिमण्या नाला पाझर तलावाचे मा.मंत्री रोहिदास पाटील यांच्या हस्ते लोकार्पण

सुमारे १८० एकर जमीन सिंचनाखाली येणार

धुळे । प्रतिनिधी

धुळे ग्रामीणचे आ.कुणाल पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून मंजुर करण्यात आलेल्या धुळे तालुक्यातील वजिरखेडा चिमण्या नाला पाझर तलाव दुरुस्तीचे काम पूर्ण झाले. दुरुस्तीनंतर चिमण्या नालाचे लोकार्पण राज्याचे ज्येष्ठ नेते मजी मंत्री दाजीसाहेब रोहिदास पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधुन माजी सैनिक भगवान मराठे यांच्या हस्ते ध्वजारोहणाने करण्यात आले. या कामासाठी आ.कुणाल पाटील यांनी २ कोटी २१ लक्ष रुपयाचा निधी मंजुर करुन आणला होता. चिमण्या नाला दुरुस्तीमुळे सुमारे १८० एकर जमीन सिंचनाखाली येणार आहे. केंद्र सरकारच्या नियोजित कार्यक्रमानुसार स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्ताने वजिरखेडा-आमदड ग्रामपंचायतीच्यावतीने पाझर तलाव लोकार्पण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

धुळे तालुक्यातील सिंचनाच्या कामांना प्राधान्य देत आ.कुणाल पाटील यांनी पांझर तलाव दुरुस्ती,के.टी.वेअर,साठवण बंधारे, नाला खोलीकरण-रुंदीकरण, पाटकालव्यांची दुरुस्ती अशी विविध कामे हाती घेत शेतकर्यांच्या शेतीचे सिंचन क्षेत्र वाढविले आहे.त्याअनुषंगाने धुळे तालुक्यातील वजिखेडा चिमण्या नाला पाझर तलावाची दुरुस्ती व्हावी अशी मागणी परिसरातील शेतकर्यांनी आ.कुणाल पाटील यांच्याकडे केली होती. कार्यक्रमाला माजी मंत्री रोहिदास पाटील यांच्यासोबत बाजार समितीचे चेअरमन बाजीराव पाटील, माजी सभापती गुलाबराव कोतेकर, खरेदी विक्री संघाचे चेअरमन लहू पाटील, बाजार समितीचे संचालक साहेबराव खैरनार,उपसभापती योगेश पाटील,माजी सरपंच रोहिदास पाटील पाटील, विशेष कार्य अधिकारी प्रकाश पाटील, संचालक एन.डी. पाटील,रावसाहेब पाटील,कुणाल पाटील, नानाभाऊ शिंदे, संदिप पाटील आदी उपस्थित होते. वजिरखेडा-आमदड ग्रामपंचायतीच्यावतीने पाझर तलाव लोकार्पण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

नऊ लाख पाच हजाराचा बनावट युरिया जप्त

दहिवेल । प्रतिनिधी

देशात 'टाटा' हा मोठा ब्रॅण्ड आहे. या ब्रॅण्डवर अनेकांचा विश्वास आहे. टाटा मोटर्स कंपनीमार्फत बी ६ व्हर्जन वाहनांच्या इंजिनमध्ये प्रदुषण नियंत्रणासाठी टाटाचे डी. ई.एफ द्रव्य वापरले जाते. मात्र, दहिवेल हद्दीत हे द्रव्य चक्क बनावट पध्दतीने तयार करण्याचा कारखाना सुरु होता. हे बनावट द्रव्य टाटा डी.ई.एफ. कंपनीच्या नावे विक्री केले जात होते. याची माहिती मिळताच साक्री पोलीस ठाण्याचे पीआय मोतीराम निकम यांनी या कारखान्यावर छापा टाकत तो उद्धस्त केला. या छाप्यात साडेनऊ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

साक्री पोलीस ठाण्याच्या अंतर्गत असलेल्या दहिवेल दुरक्षेत्राच्या परिसरात बनावट डी. ई.एफ युरिया उत्पादनाचा कारखाना सुरु असल्याची माहिती पीआय मोतीराम निकम यांना १४ आगॅस्ट रोजी मिळाली. दहिवेलनंदुरबार रस्त्यावर महामार्गालगत महेंद्र विठ्ठल गवळे यांच्या शेतातील पोल्ट्रीफार्ममध्ये हा कारखाना सुरु होता. मालट्रक व चारचाकी वाहनांचे प्रदुषण कमी करण्यासाठी हे द्रव्य वापरले जाते. यदीड लाख रुपये किमतीच्या प्लास्टिकच्या १५ टाक्या, प्रोसेसर, जनरेटर, युरीच्या बॅग आदी साहित्य जप्त केले. या छाप्यात एकूण ९ लाख ५६ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

जिल्ह्यात खतांचा तुटवडा थांबणार

पालकमंत्र्यांकडून संबंधित कंपन्यांची कानउघाडणी

नाशिक । प्रतिनिधी

जिल्ह्यात खत टंचाई जाणवत असल्याची बाब निदर्शनास आल्याने नाशिक जिल्हा पालकमंत्री दादाजी भुसे यांनी कृषी विभाग व सर्व खत कंपनी प्रतिनिधी यांची नाशिक जिल्हयात अनुदानित खते पुरवठ्याबाबत आढावा बैठक घेतली. यावेळी पालकमंत्री दादाजी भुसे यांना गंभीर बाबी निदर्शनास आल्याने त्यांनी तातडीने सर्व कंपनीना पत्र व्यवहार करत दिलेल्या उदिष्टानुसार खत पुरवठा करण्याच्या सूचना दिल्या आहेत. दरम्यान पालकमंत्र्यांकडून संबंधित कंपन्यांची चांगलीच कानउघाडणी करण्यात आली आहे.

जिल्ह्यात अनेक कंपनीने महिनानिहाय प्राप्त झालेल्या आवंटनानुसार नियमीत अनुदानित खतांचा नाशिक जिल्हयात पुरवठा केलेला नसल्याची बाब पालकमंत्र्यांच्या निदर्शनास आल्याने मंत्री भुसे यांनी सबंधित यंत्रणेला शेतकऱ्यांना खताचा तुटवडा जाणवायला नको. यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करण्याच्या सूचना दिल्या असून येत्या आठ दिवसाच्या आत ही कोंडी सोडविण्याची सूचना केली आहे.

सद्यस्थितीत नाशिक जिल्हयात पेरणीच्या अनुषंगाने, युरीया खताच्या मागणीत मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. या बाबत कृषी विभागाने सबंधित कंपनी प्रतिनिधी यांचेकडे वारंवार पाठपुरावा करुन देखील नाशिक जिल्हयात खतांचे रेक उपलब्ध होत नसल्याचे मंत्री भुसे यांच्या निदर्शनास आले आहे. तसेच जिल्हाधिकारी यांनी देखील याबाबत कंपनीस लेखी पत्र दिल्याची बाब आढावा बैठकीत निदर्शनास आली.

जिल्ह्यात जवळपास सर्वच कंपनीने मंजुर आवंटनानुसार अनुदानित खतांचा पुरवठा जिल्ह्यात न केल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेवून या बाबत संबंधित खत कंपनीचे राज्यस्तरीय अधिकारी यांना भ्रमणध्वनी द्वारे नियमीत खत पुरवठ्याबाबत पालकमंत्री दादाजी भुसे यांनी सुचना दिल्या आहेत. त्यानुसार नाशिक जिल्ह्यात तात्काळ मंजुर आवंटनाप्रमाणे मागील पुरवठ्यातील तुटीसह शिल्लक खत पुरवठा करावा, तसेच युरीया खताचा प्राधान्याने तात्काळ पुरवठा करण्याबाबत आदेश संबंधित पुरवठादार कंपनीना दिले आहेत.

अधिकस्य अधिकम् फलम् : भाव वाढूनही चांदीच्या दिव्यासह जोडव्यांची वाढली मागणी

दर तीन वर्षांनी येणारा अधिकमास यंदा सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आला आहे. अधिक महिना म्हणजे व्रतवैकल्यांचा काळ. देवाला नैवेद्य अन् जावयांना वाण देऊन त्यांना सन्मानित करणे हे या काळातील महत्कर्तव्य. गोदेमध्ये डुबकी मारून पुण्यसंचय केला जातो, ते वेगळेच. अधिकमासात सोने, चांदी, तांबी पितळाची भांड्यांनाच नव्हे तर कपड्यांना देखील मागणी वाढलेली दिसते. यंदाच्या अधिकमासात अनारशांचा दरवळ लागला, बाजारपेठांमध्ये चैतन्य संचारले. शहरात आणि जिल्ह्यात कोट्यवधी रूपयांची उलाढाल झाली.

अधिकमासात अनेक महत्त्वाच्या वस्तूंसोबतच काही किरकोळ वस्तूंला देखील फार महत्त्व आले आहे. एकाद्या शुभ कार्यात बऱ्याचदा लहानसहान वस्तु चांगलीच धावपळ उडवतात. पौराणिक महत्त्व असणाऱ्या अधिक मासात सोन्याचांदीच्या मोठ्या वस्तूंसोबतच बत्तासे, अनारसे, तांब्याचे निरंजन, तांब्याचे पत्री लहान दिवे, द्रोण तसेच वाती यांवस्तूं मोलाच्या तसेच अधिकमासात महत्वाच्या आहेत. अधिकमासात देवांना वाण लावण्याची पौराणिक धार्मिक प्रथा आहे. यासाठी वाण लावताना या वस्तूंची गरज भासते. बत्तासे आणि अणारसे यांच्या सोबत तांब्याचा पत्री दिवा किंवा शक्य असल्यास तांब्याचे निरंजन वाणमध्ये दिले जाते. देवीदेवतांच्या मंदिरात जाऊन भगिनी बत्तासे, अनारसे हे एका द्रोणमध्ये ठेवत यात एक तांब्याच्या दिवा लाऊन आरती करत हे वाण लावतात. अशावेळी बात्तासांच्या भावात चांगलीच वाढ झालेली दिसून येते. जसा बत्तासा असेल तशी त्याची किंमत लावली जात आहे. साधारण ७० रुपये तर ११० रुपयांपर्यंत या बात्तासांची किंमत बाजारात आहे.

शोध बातमी
पुरुषोत्तम पाटील
मुख्य उपसंपादक
मो.७०५७०१११२६

कीर्तनकारांची चणचण

अधिकमासानिमित्त सर्वत्र हरिपाठ, भागवत सप्ताह आदी कार्यक्रम आयोजित करण्यात येत असल्याने कीर्तनकारांची चणचण भासू लागली आहे. त्यातच कीर्तनाचा ट्रेंड बदलल्याने सध्याच्या पिढीतील कीर्तनकारांना चांगली मागणी मिळू लागली आहे. संत नामदेवांपासूनची परंपरा असलेले कीर्तन शहरी आणि ग्रामीण या दोन्ही ठिकाणी लोकप्रिय आहे. शास्त्र, पुराण, इतिहासातील घटना कथेतून सांगितले जाणारे कीर्तन काळानुरूप बदलू लागले आहे. धार्मिकतेची चौकट मोडून समाजप्रबोधनाचा वसा पुढे नेण्याचे काम कीर्तनकार करत आहेत. त्यामुळे समकालीन जाणिवांचे प्रतिबिंबही त्यात उमटू लागले आहे. ग्रामीण भागातच नव्हे; तर शहरातही कीर्तनाचे असंख्य कार्यक्रम होत असल्याने कीर्तनकारांची उणीव भासत आहे. त्याच आषाढी वारी आल्याने कीर्तनकार पंढरपूरकडे प्रस्थान करीत आहेत, त्यामुळेही कीर्तनकारांचा भाव वधारला आहे.

चांदीला झळाली अधिक

एरवी सोन्याला मागणी असली तरी अधिक मासामध्ये चांदीचे महत्त्व सोन्याहूनही अधिक आहे. त्यामुळेच गेल्या पंधरा दिवसांपासून चांदीच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे. शहरातील सराफ व्यावसायिकांकडे दररोज प्रत्येकी सहा ते दहा किलो चांदीची विक्री होत आहे. त्यामुळे दररोज लाखोंच्या घरात ही चांदीची उलाढाल सुरू आहे. अधिक महिना आणि चांदीचे अटोक्यात असलेले दर असे दुहेरी लाभ सध्या ग्राहकांना होत आहेत. सध्या चांदीचा भाव ३६ हजार ते ३७ हजारांच्या दरम्यान आहे. त्यामुळे चांदीच्या खरेदीला बाजारपेठेत उधाण आले आहे.

अनारशांना आली गोडी: अधिकमास महिन्याकाठी १६ ते १७ हजार किलो अनारशाचे पीठ विकले जाते. एकशे दहा ते एकशे वीस रूपये किलो याप्रमाणे सुमारे २० लाख रुपयांची उलाढाल अनारसे पीठ विक्रीतून होत असल्याची माहिती विक्रेत्यांनी दिली आहे.

नाशिकच्या चांदवड टोलनाक्यावर पाकिस्तान जिंदाबादच्या घोषणा

नाशिक । प्रतिनिधी

पुण्यात स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला पाकिस्तान झिंदाबादचे नारे दिल्याचा प्रकार उघडकीस आला होता. त्यानंतर आता चांदवड शहर परिसरात टोल नाक्यावरील कर्मचाऱ्याने पाकिस्तान झिंदाबादच्या घोषणा दिल्या आहेत. या प्रकरणी संबंधित कर्मचाऱ्यास तातडीने पोलिसांनी ताब्यात घेतले असून टोलनाका व्यवस्थापकाने कर्मचाऱ्यास निलंबित करण्यात आले आहे.

देशभरात काल स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. अशातच नाशिकच्या चांदवड येथील मंगरूळ टोलनाक्यावरील कर्मचाऱ्यांनी पाकिस्तान जिंदाबादचे नारे दिल्याची घटना घडली. त्यामुळे टोलनाक्यावर काम करत असलेल्या इतर कर्मचाऱ्यांना आश्चर्य व्यक्त केले. तातडीने स्थानिकांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. तसेच टोल प्रशासनाने तात्काळ संबंधित कर्मचाऱ्यास निलंबित केले आहे. मात्र या घटनेने चांदवड शहरसह परिसरात चांगलीच खळबळ उडाल्याचे पाहायला मिळाले. दरम्यान स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी 'पाकिस्तान झिंदाबाद'च्या घोषणा देणाऱ्या नाशिकच्या चांदवड येथील मंगरूळ टोलनाक्यावरील कर्मचारी यास तातडीने निलंबित करण्यात आले आहे.

प्रगतीचा महामेरू

आज भारतीय स्वातंत्र्याचा ७६वा वर्धापन दिन साजरा होत आहे. स्वातंत्र्य मिळाल्यापासून ७५ वर्षे पूर्ण झाल्यालाही आज एक वर्ष लोटले आहे. त्यानंतर इतक्या वर्षांत भारताने अफाट प्रगती केली आहे, हे सत्य नाकारण्यात अर्थ नाही. इंग्लंडसारख्या राष्ट्राला अर्थव्यवस्थेत मागे टाकून भारताने पाचवा क्रमांक पटकावला आहे. व्यापाराच्या बाबतीत भारत आज सर्वांच्या पुढे आहे आणि भविष्य तर प्रचंड उज्ज्वल आहे. असे म्हणतात की, २०४७ मध्ये भारताचा क्रमांक जगात तिसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून असेल. जो देश केवळ हत्ती आणि सापांचा म्हणून ओळखला जात होता, त्या देशासमोर आज अर्धे जग नतमस्तक होत आहे, यावरून देशाने किती प्रगती केली आहे, याचा अदाज यावा. याचे श्रेय अर्थातच निःसंशय पंतप्रधान मोदी यांचेच आहे. काँग्रेस सरकारांच्या काळात प्रगती झाली नाही, असे नाही. इंदिरा गांधी यांनी केवळ 'गरिबी हटाव'च्या घोषणा दिल्या. प्रत्यक्षात गरिबी हटलीच नाही. गरीबच हटले, असे तेव्हा विनोदाने म्हटले जाई. ते शब्दशः सत्य होते. पण मोदी सरकारच्या काळात कोणत्याही घोषणा न करता प्रचंड प्रगती झाली आहे, हे निष्ठावंत काँग्रेसजनही नाकारू शकणार नाहीत. भारतात एकेकाळी अन्नधान्याचा तुटवडा होता. अधिक धान्य पिकवा, अशा घोषणा सरकारी पातळीवरून दिल्या जात होत्या. देशाला 'मिलो' नावाचा सडका गहू अमेरिकेकडून आयात करावा लागत होता. आज ती परिस्थिती होती, असे सांगितले तर नव्या पिढीला विचित्र वाटेल. अन्नधान्य आयात करण्याची वेळच आज भारतावर नाही. अन्न महामंडळाची कोठारे धान्याने ओसंडून वाहत आहेत आणि परिणामी लोकांना धान्याचा तुटवडा भासण्याचे कारणच पडत नाही. देश आज सर्वच बाबतीत विशेषतः संरक्षणाच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला आहे. 'आत्मनिर्भर भारत' ही घोषणाच मोदी यांनी दिली आहे आणि प्रत्येक देशवासीयांनी ती मनावर घेतली आहे. परिणामी आज भारत उत्पादनाच्या बाबतीत स्वयंपूर्ण आहे. पूर्वी केवळ उद्योगपती म्हटले की, टाटा आणि जी. डी. बिर्ला अशी दोनच नावे समोर यायची. आजही जुन्या लोकांच्या तोंडी हीच नावे येतात. पण आज अदानी-अंबानींसह कित्येक उद्योगपती देशाचे नाव जगाच्या नकाशावर फडकवत आहेत. कित्येक उद्योगपती जगाच्या सर्वात श्रीमंतांच्या यादीत म्हणजे फोर्ब्स यादीत आहेत. त्यात महिलाही आहेत. भारताची सर्वात मोठी प्रगती म्हणजे भारत आज अण्वस्त्र सज्ज आहे. पाकिस्तानच काय पण कोणतेच राष्ट्र आज भारताकडे वाकडे डोळे करून पाहू शकत नाही. एकदाच पंडित नेहरूंच्या भोळसटपणामुळे भारताला १९६२ साली पराभव पत्करावा लागला होता. पण आज भारताकडे शक्तिशाली अस्त्रे आणि प्रचंड अण्वस्त्रसाठा आहे. जो देशाकडे वाकडा डोळा करून पाहणाऱ्या चीनमधील शहरेही बेचिराख करू शकतो. शांतता ही बळाच्या सामर्थ्यावरच टिकू शकते, हा धडा भारत शिकला आहे. त्यामुळे आज पाकिस्तानसह कुणाही देशाची भारताला त्रास देण्याची हिंमत नाही. भाजपचे माजी पंतप्रधान दिवंगत अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळात देशाने अणुचाचण्या घडवल्या. त्यातून भारताने देशाची सुरक्षा कायमची सुनिश्चित केली आहे. मध्यंतरी कोरोनाने देशाच्या प्रगतीत अडथळा आणला. पण भारताने लसी उपलब्ध करून त्यावरही मात केली. आज जगातील अनेक देशांना भारताने लसी पुरवल्या आहेत. भारताचे पंतप्रधान मोदी यांना सारे जग मानते. इतके की, रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्धात मोदी यांची मध्यस्थी मानण्याची तयारी दोन्ही देशांनी दर्शवली आहे. ही आंतरराष्ट्रीय बाबतीत भारताची प्रगतीच आहे. शिक्षण, आरोग्य, बुद्धिमत्ता आणि कोणतेही क्षेत्र नाही की, ज्यात भारताने प्रगती केलेली नाही. दहशतवादावर भारताने मात केली आहे. २००८च्या मुंबई हल्ल्यानंतर तसा हल्ला करण्याची हिंमत कोणत्याही अतिरेकी संघटनेची झालेली नाही. इतकेच नव्हे, तर मोदी आणि शहा यांच्या सरकारने पाकिस्तानव्याप्त कश्मीरमध्ये बालाकोट येथे हवाई हल्ले घडवून कित्येक दहशतवाद्यांना कंठस्नान घातले. असा प्रति हल्ला कोणत्याही सरकारच्या काळात झाला नव्हता. काँग्रेसचे सरकार केवळ निषेधाचे खलितेबाज सरकार होते. पण आता तसे नाही.

विभिषिका दिनाच्या दुर्दैवी कहाणीचे स्मरण का?

कै. अटलजी यांनी एका काव्यात म्हटले आहे,

'कलकत्ता के फूटपाथो पर जो आंधी, पानी सहते है जाकर पूछो उनको, १५ ऑगस्ट के बारे मे वो क्या कहते है!'

दुर्दैवाने आम्ही कलकत्त्यापासून आमच्या गावात कुठेही आमच्या फाळणीच्या काळातील विस्थापित बंधूंची चौकशी, विचारपूस केली नाही. वास्तव समजून घेतले नाही. भारतभर जेथे रेल्वे स्टेशन होते, तेथे आमचे हे विस्थापित बंधू पोहोचले. स्वकर्तृत्वावर विस्थापित न राहता प्रस्थापित झाले.

आम्ही स्वातंत्र्याच्या आनंदात इतके मश्गूल झालो की, अटलजी यांच्याच दुसऱ्या काव्यपंक्ती आम्ही खऱ्या ठरवल्या. त्यांनी म्हटले होते,

'जो पाया उस मे खो न जाये, जो खोया उसको
ध्यान करे'!

स्वातंत्र्याचा आनंद सर्व राष्ट्रप्रेमी भारतीयांना होणे स्वाभाविकच होते; पण स्वातंत्र्य मिळवण्यापोटी आम्ही काय नुकसान सहन केले? हे आम्ही कधी विचारातच घेतले नाही. परिणामस्वरूप स्वतंत्र झाल्यावरही आमच्याच देशात आमच्याच काश्मिरी बंधूंना विस्थापित शिबिरात राहण्याची वेळ आम्ही आणली. खरा इतिहास समजून घेणे आणि तो इतिहास न विसरता त्यातून काही शिकणे, हे न केल्याचे परिणाम आज आम्ही देशात विविध ठिकाणी फुटीर गट करत असलेल्या कारवायांच्या रूपाने बघत आहोत. सांस्कृतिकदृष्ट्या खऱ्या अर्थाने एकात्म असलेल्या या भारत वर्षात शासक आणि शासन वेगवेगळी असली, भाषा, खान-पान यात विविधता असली तरी सर्वांची राष्ट्र म्हणून समान आकांक्षा होती. समानपूर्व गौरव होते. समान शत्रू होते आणि त्यामुळेच शक, कुशाण, ग्रीक आक्रमण आम्ही पचवले आणि त्यांना येथील संस्कृतीत संमिलित करून घेतले. दुर्दैवाने खैबर खिंडीतून आणि नंतर अन्य उत्तर, पश्चिम भागातून आलेले मुस्लीम आक्रमण आम्ही समजून घेण्यात अपयशी ठरलो आणि त्यातून एक एक भूभाग गमावून बसलो. थेट इराणशी जोडलेल्या आमच्या सीमा संकुचित होत गेल्या. गांधार गमावले, ब्रह्मदेश गमावले आणि इंग्रज शासनाकडून स्वातंत्र्य मिळवताना बंगाल, सिंध, पंजाब गमावले. जणू काही प्रधानमंत्र्यांनी वर्णन केल्याप्रमाणे भारत मातेच्या हाता-पायातील बेड्या काढण्यासाठी चालू असलेल्या प्रयत्नांना यश येत नाही म्हटल्यावर, त्या भारत मातेच्या भुजाच आमच्या त्या वेळच्या नेतृत्वाने कापून काढल्या.

१९४७ साली झालेले देशाचे विभाजन ही एक मोठ्या विमर्शाचा अटळ परिणाम आहे. अलिगढ विद्यापीठाची स्थापना, सर सय्यद अहमद खान यांनी मांडलेला द्विराष्ट्रवाद सिद्धांत, बंगालच्या फाळणीचा १९०६चा प्रयोग, १९१६ चा लखनऊ करार (मतदारसंघात मुस्लीम राखीव जागा मान्यता), १९२० चा खिलापत प्रयोग, वंदे मातरमला विरोध, लीगचा उदय, डायरेक्ट रलींळेप चा जीनांचा आदेश आणि हिंदूंचा आमच्या नेत्यांवर असलेला अंधविश्वास या सर्वांची परिणीती म्हणजे फाळणीचा कटू प्रसंग आहे. याला दुसरी एक विमर्शची बाजू आहे, ती म्हणजे हिंदू समाज जीवनाला शिक्षणाच्या माध्यमातून संभ्रमित केले गेले जाण्याची. फाळणीमुळे काय नुकसान होणार आहे, हे समजण्यासाठी आवश्यक असणारी संवेदनशील मने या शिक्षणाने मारून टाकली. भारत हे कधीच एक राष्ट्र नव्हते, त्यामुळे 'नेशन इन मेकिंग' हा भ्रम पसरवला गेला. या भ्रमात आम्ही आमचा इतिहास विसरलो.

इतिहास विसरण्याची ही प्रक्रिया दुर्दैवाने स्वातंत्र्यपूर्व काळात

तर होतीच, पण उत्तर काळात आहे तशी चालू राहिली. आता ही प्रक्रिया काँग्रेसच्या मलिद्यावर पोसणाऱ्या डाव्यांनी चालू ठेवली आणि त्यामुळे सगळाच इतिहास विकृत पद्धत वापरून मांडला गेला. विद्यापीठे आणि प्रशासन यामधून खरा इतिहास विसरून खोटा इतिहास पसरवला गेला. त्यातून निर्माण झालेले गंभीर परिणाम आज आपण भोगत आहोत. स्वातंत्र्य मिळाल्यावर काही महिन्यांत आम्ही काश्मीरचा भूभाग गमावला. आसामचा भाग आम्ही गमावण्याच्या अवस्थेत असताना आमच्या प्रधानमंत्र्यांनी 'चू हशर्रीीं सेशी ुळींह -रीरा शिश्रिश' असे म्हणून शेवटचा निरोप दिला होता.

लडाखमधील काही भाग चीनने रस्ता करण्यासाठी वापरायचे ठरवले, तर त्या भागात गवताचे पाते पण उगवत नाही, हे नेहरू यांचे उत्तर होते. ६२ च्या युद्धात चीनने आमचा भूभाग हडप केला. भारत मातेच्या ललाटी विभाजनाचा अभिशाप संपत नव्हता. गेलेले परत मिळणे तर दूर राहिले. आम्ही एक एक भाग गमावत राहिलो. अगदी दुर्गा म्हणून गौरव केलेल्या इंदिराजी यांनी दक्षिणेतील एक बेट श्रीलंकेला बहाल केले. हे शांतपणाने आम्ही सहन करत होतो. आजही करत आहोत, याचे मुख्य कारण आम्ही जो इतिहास शिकायचो तो शिकलो नाही, किंबहुना तो विसरलो. आम्ही सिंधच्या राजा दाहीरचा आणि त्याच्या दोन कन्येचा पराक्रम विसरलो. आम्ही पृथ्वीराज चौहान याला मोहम्मद घोरी याने दिलेल्या यातना विसरलो. आम्ही राणा प्रताप यांस अकबराच्या मुळे भोगावा लागलेला वनवास विसरलो.

सोमनाथ मंदिराचा गझनीने केलेला विध्वंस विसरलो. बाबराने तोडलेले राम मंदिर विसरलो. औरंगजेबाने मथुरा आणि काशी विश्वनाथ यांचे केलेले विध्वंस विसरलो. आम्ही कृष्ण देवराय याचे मुंडके गटारीला जोडणारा अल्लाउद्दीन खिलजी विसरलो आणि धर्मवीर संभाजी राजे यांचे बलिदान पण विसरलो. टिपूचे क्रौर्य विसरलो आणि आमच्या योद्ध्यांनी लढताना गाजवलेले शौर्यही विसरलो. त्यामुळे आम्हाला भक्त प्रल्हाद यांच्या भक्तीने जेथे नरसिंह प्रकट झाले, त्याचे मंदिर मुलतानमध्ये आहे आणि जे आज पाकिस्तानात आहे, याचे दुःख नाही. लाहोर हे शहर आमच्या प्रभू रामचंद्राच्या लव या मुलाची राजधानी याचे सहज विस्मरण आम्हाला झाले. शीख पंथाची स्थापना झालेले ऐतिहासिक स्थळ भारतात नाही, याची कुठलीच खंत आम्हाला त्यामुळे नाही. भगतसिंग यांचे जन्मस्थळ आम्ही बघू शकत नाही. यामुळे आमचे मन विषण्ण होत नाही कारण विसरलेल्या आणि चुकीच्या शिकलेल्या इतिहासाने आमची मने ही दगडासारखी झाली आहेत.

फाळणीच्या त्या अंधकारमय वातावरणात त्यावेळी सुमारे २५ लाख लोकांचे विस्थापन झाले. पाच ते दहा लाख लोकांना जीव गमवावा लागला. अनेकांना आपल्या स्त्रियांवर डोळ्यांसमोर झालेले अत्याचार सहन करावे लागले. हजारो धर्मांतरे झाली. जगाच्या पटलावर हे अत्याचार आम्ही कधी आणू शकलो नाही, वाचा फोडू शकलो नाही. याचे कारण म्हणजे त्या वेळच्या आमच्या राज्यकर्त्यांना ते परवडणारे नव्हते. पण आता वेळ आली आहे. इतिहासाच्या आड दडलेली काही पापे, काही कारस्थाने, काही ठरावीक लोकांच्या क्षुद्र महत्त्वाकांक्षा यांनी लक्षावधी लोकांचे जीव गेले. अनेकांना जबरदस्तीने धर्म बदलावे लागले. भारतमातेचे तुकडे झाले, हे विभिषिका दिनाच्या निमित्ताने लक्षात घ्यावे लागेल. हे सत्य समजून घेताना पाषाणवत झालेल्या समाजमनाला सचेतन करण्याची गरज आहे. प्रयत्न केल्यावर पाषाणातून पाणी निघते, मग आम्ही तर माणसे आहोत. अजूनही वेळ गेलेली नाही. विभाजनाच्या कटू आठवणी यासाठी जपायच्या की, कधी काळी आम्ही गमावलेला आमचा भूभाग आम्ही पुन्हा मिळवू यासाठी. ही आकांक्षा बाळगण्यात कुठेही स्वप्नरंजन नाही. कारण मुळात फाळणी ही अनैसर्गिक आहे हे सत्य आहे. या अखंड भारतात पूजा पद्धत कुठलीही असली तरी त्याला स्वातंत्र्य होते आणि ते राहणारच आहे. पण दुसऱ्यांना अस्तित्व नाकारण्याचा प्रयत्न आता खपवून घेतला गेला नाही पाहिजे. आज भारतात निर्माण झालेले 'लव्ह जिहाद', श्ररपव जिहाद, दहशतवाद या सर्व प्रश्नांचे उत्तर अखंड भारत संकल्पनेत सामावलेले आहे. यात कुठलाही वसाहतवादी दृष्टिकोन नाही; तर आम्ही गमावलेला आमचा भूभाग परत मिळवण्याचा नैसर्गिक अधिकार आहे.

विभिषिका दिन हा एका अर्थाने अखंड भारतासाठी संकल्प करण्याचा दिवस आहे. हे स्मरण नाही, तर आमची राष्ट्राप्रती ही वचनबद्धता आहे. ज्या हिंदू समाजाने स्वतंत्र भारतात आपण सुखी राहावे म्हणून प्राण गमावले, स्वकीय, कुटुंबीय, जमीन-जुमला गमावला, प्रतिष्ठा गमावली त्यापैकी आज कुणी जिवंत नाहीत. त्यांची पुढील पिढी पण आता वयोवृद्ध झाली आहे. पण आज त्यापैकी जे सिंधी, पंजाबी, शीख बंधू आहेत, त्यांच्या तरुण पिढीला आशवस्थ करण्यासाठी विभिषिका दीन आहे. अखंड भारत संकल्प दिन आहे, हे लक्षात ठेवण्याची गरज आहे. सुदैवाने आंतरराष्ट्रीय स्तरावर घडणाऱ्या घडामोडी, युरोप, इंग्लंडमध्ये घडत असलेले प्रसंग यातून काही देशांना भारताला गेल्या हजारो वर्षात काय भोगावे लागले आहे, याची कल्पना आलेली आहे. त्यामुळे एक जो न्यूनगंड अखंड भारत या संकलप्नेत अनेकांना वाटत होता, तो कमी व्हायला हरकत नाही. खुद्द पाकिस्तानातील सिंध, बलूची पंजाब प्रांतात अस्वस्थता वाढत आहे. श्रीलंकेची स्थिती आपल्याला माहीत आहेच. संघराज्य पद्धत स्वीकारून भारतीय उपखंड म्हणून भविष्यात भारताचे नेतृत्व स्वीकारण्याची मानसिकता हळूहळू निर्माण होत आहे.

विभिषिका दिन म्हणजे फाळणीच्या काळातील अत्याचाराची केवळ आठवण एवढा मर्यादित अर्थ न घेता, तो संकल्पाचा दिवस आहे. तो गमावलेल्या आमच्या सांस्कृतिक वारसा परत मिळवण्याचा दृढसंकल्प करण्याचा दिवस आहे. याबाबतीत ज्यू समाजाचा आदर्श आपण समोर ठेवला पाहिजे. अनेक वर्षे आपला भूभाग हरवलेल्या या समाजाने आपले राष्ट्र उभे करून दाखवलं ते पण अरब देशांच्या नाकावर टिच्चून! हिब्रू ही त्यांची राष्ट्र भाषा ! एकेकाळी जगात मृत झालेली ही भाषा आता पुन्हा जिवंत केली ज्यू समाजाने आपल्या जिद्दीवर! ते यशस्वी झाले त्या मागे होती प्रखर राष्ट्रभावना! याच राष्ट्र भावनेचा जागर हा आमच्या विभिषिका दिनाचा उद्देश आहे. त्यासाठी कृतीबद्ध होऊ या. देशाच्या अमृत काळात अखंड भारताचे स्वप्न पूर्ण होईल, या अपेक्षेने विभीषिका दिनाकडे बघू या.

- रवींद्र मुळे : नगर

'अमृत भारत' प्रगतीचे एक पाऊल

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात विकासाची चक्रे झपाट्याने फिरत आहेत. देशातील ५०८ रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास हा त्यातील एक भाग आहे. ज्या ज्या ठिकाणी रेल्वे स्थानके आहेत तेथे कमी-अधिक प्रमाणावर सुविधा आहेत. त्यात अधिक भर टाकण्याचा जो प्रयत्न असून भारताची विकसित देशाकडे जी वाटचाल सुरू आहे, त्या कडीतील रेल्वे स्थानकांचा विकास हे एक त्यापुढील पाऊल आहे. रेल्वे स्थानकांवर विविध प्रकारच्या सुविधा निर्माण करणे आणि त्याचा प्रवाशांना लाभ पोहोचविणे हे सरकार म्हणून सरकारचे कामच आहे, हीच भावना पंतप्रधान नरेंद्र मोदी पार पाडत आहेत. रेल्वे स्थानक केवळ भकास अवस्थेतील केंद्र न बनता विकास आणि प्रसन्नतेचे केंद्र बनले पाहिजे ही त्या मागील भावना आहे. भले यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च होत असला तरी तो देशातील लोकांसाठी अथवा प्रवाशांसाठी होत आहे, ही एक समाधानाची बाब आहे.

'अमृत भारत स्टेशन' पुनर्विकास योजना असे या नव्या योजनेचे नाव असून देशभरातील ५०८ स्थानकांचा या योजनेमुळे कायापालट होणार आहे. रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते व्हीडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे या योजनेचा शुभारंभ करण्यात आला. जवळपास २५ हजार कोटी रुपयांची ही योजना पूर्णत्वास जाण्यासाठी काही कालावधी लागणार आहे. यामध्ये महाराष्ट्रातील ४४ रेल्वे स्थानकांच्या समावेश आहे. त्यातील कांजूरमार्ग, विक्रोळी आणि परळ या मुंबईतील तीन रेल्वे स्थानकांचाही कायापालट होणार आहे. महाराष्ट्रातील या रेल्वे स्थानकांच्या पुनर्विकासासाठी १ हजार ५०० कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी खर्च होणार आहे. भारताची थ्री ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था करण्याचे मोदी सरकारचे उद्दिष्ट असल्याने त्या स्वरूपाच्या सोयी-सुविधा देशात निर्माण करून प्रगतीच्या दृष्टीने पावले टाकणे आवश्यक आहे. त्या दृष्टिकोनातूनच हे पाऊल आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

नवीन भारत हा विकसित भारताच्या उद्दिष्टांच्या दिशेने वेगाणे वाटचाल करणाऱ्या अमृत काळाची सुरुवात असल्याचे या योजनेचा शुभारंभ करताना संबोधितप्रसंगी पंतप्रधान म्हणाले. यामागे नवीन ऊर्जा, नवीन प्रेरणा आणि नवीन संकल्प असल्याचेही त्यांनी अधोरेखीत केले. तसेच भारतीय रेल्वेच्या इतिहासात ही नवीन पर्वाची सुरुवात असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. गेल्या नऊ वर्षांच्या काळात देशात टाकलेल्या रेल्वे रुळांची लांबी ही दक्षिण आफ्रिका, यूक्रेन, पोलंड, ब्रिटन आणि स्वीडनमधील एकत्रित रेल्वे नेटवर्कपेक्षा जास्त आहे, तर गेल्या वर्षभरात भारताने दक्षिण कोरिया, न्यूझिलंड आणि ऑस्ट्रेलिया या देशांच्या एकत्रित रेल्वे नेटवर्कपेक्षा जास्त रेल्वेमार्ग भारताने निर्माण केले आहेत. यावरून अन्य देशांच्या तुलनेत भारत मागे नाही, भारताची पावले पुढेच पडत असल्याचे यावरून स्पष्ट होते. देशातील रेल्वेचे जाळे अधिक मजबूत करण्यासाठी देशाच्या अर्थसंकल्पात २.५ लाख कोटींपेक्षा अधिक निधीची तरतूद करण्यात आली असल्याने रेल्वे खाते एकंदरीतच प्रवाशांसाठी अधिक सुविधा निर्माण करून देण्यासाठी कार्य करीत असल्याचे त्यावरून दिसते. या नव्या योजनेत वाहतूक हाताळणीत सुधारणा आणि फिरणाऱ्या क्षेत्राचे सुशोभीकरण, चांगल्या आणि रुंद प्रवेशद्वाराची तरतूद, उच्चस्तरीय प्लॅटफॉर्म आणि प्लॅटफॉर्मवर अतिरिक्त कव्हर (सल्टर)ची तरतूद, स्टेशन इमारतीचा दर्शनी भाग आणि उंचीमध्ये सुधारणा, शौचालयांची स्थिती सुधारणे, एक्झिक्युटिव्ह लाऊंज, चांगल्या दर्जाच्या टिकाऊ फर्निचरसह वेटिंग रूमची तरतूद, रॅम्प, लिफ्ट, एस्केलेटरसह १२ मीटर रुंद मध्यवर्ती एफओबीची तरतूद, दुसरे प्रवेशद्वार सुधारणे, स्टेशन परिसरात उत्तम प्रकाश व्यवस्था आदी सुविधा प्रदान करण्यात येणार असल्याने प्रवाशांच्या दृष्टीने ही समाधानाची बाब आहे.

या अमृत भारत रेल्वे स्थानक पुनर्विकास योजनेच्या माध्यमातून विविध प्रकारच्या सोई-सुविधा निर्माण करून देत असताना देशात आज अनेक रेल्वे स्थानकांची अवस्था खराब आहे. त्याकडेही लक्ष देण्याची गरज आहे. शिवाय जेथे रूळ वाकडे झाले, दबले असल्यास ते बदलणे, फिश प्लेट बदलणे, ओव्हर हेड वायरकडे लक्ष देणे, सिग्नल यंत्रणा मजबूत करण्यावर भर देऊन होणारे अपघात टाळावे लागतील. जुनाट रेल्वे रूळ बदलावे लागतील. देशातील प्रवाशांची सुरक्षितता सर्वात महत्त्वाची असून त्यांना सुरक्षित आणि सुखद प्रवासाचा विश्वास द्यावा लागणार आहे. अलीकडेच दोन गाड्या समोरासमोर येऊन एकमेकांवर धडकल्या होत्या. त्यामुळे मोठा अपघात होऊन २७५ प्रवाशांना आपले प्राण गमवावे लागले होते. म्हणून जेथे जेथे धोके आहेत, ते ओळखून त्यावर बारकाईने विचार करावा लागेल. असे सर्व केले तरच रेल्वे विभाग ज्या काही सुविधा प्रवाशांना निर्माण करून देत आहे, त्याला एक अर्थ प्राप्त होईल.

शब्दकोडे-१५१



आडवे शब्द - १. सुयोग्य तिऱ्हाईताने कानउघडणी करणे (वाक्प्रचार) ९. त्वरेने, एका मागून एक १२. दरवाजा १३. खेद आणि खंत १४. पर्जन्यकाळ १५. खंदक १६. आतेमामे भावंडात लग्न असल्यास एकाच्या सासूबाई १७. किरकोळ १९. लेखणीचा एक जुना प्रकार २१. रक्षण करणारा २३. शेराचा सोळावा भाग २४. आजूबाजूला २७. कोवळी फांदी २९. हिंदीत आयोध्या ३०. एक मंगलवाद्य ३२. नशीब ३३. अगदी थोड्या प्रमाणात ३५. पुनर्जीवन ३८. चौक ३९. घोड्याच्या पायाखाली लावलेली लोखंडी पट्टी ४१. चारपट ४२. होडी ४३. खमण ढोकळ्याचे शहर ४४. द्यायचा-खायचा मान ४५. ग्रामप्रमुख ४६. निरुपोगी अळू ४८. किंमत, पैसा ५०. जोरदार वाद ५१. दृष्टीभेट ५४. जन्मकुंडलीत आडवी येणारी ५५. अगदी सत्य, वास्तव ५७. मालक ५८. मध्यस्थ ६०. भित्रा, घाबरट ६२. हळूवारपणे ६३. हिंदीत मदत ६६. वाणी, बोलणे ६७. रम्य, मनोहारी ६८. प्रश्नोत्तरे ७०. पदार्थाचा सूक्ष्म भाग ७१. फोडणीचे ताक ७३. एक श्वासरोग ७४. नामघोष ७६. सुस्वरूप स्त्री ७७. परिस्थिती ७८. दुसऱ्यासाठी केलेला खर्च

उभे शब्द - १. उदाहरणासह २. महिला ३. सदोदित, रोज ४. मृत्यू, वेळ ५. कालवा (हिंदी) ६. मोठ्या संख्येत धाड घालणारा कीटक ७. भाजलेले हरभरे ८. शेजारी शेजारी ९. चुकवाचुकव १०. जप्ती ११. पांढुरक्या रंगाचा १४. पवित्र १६. मर्कट १८. रोखलेली नजर २०. कापूस २२. बागवान २५. खून, हत्या २६. खळबळजनक २८. जय पराजय २९. मालिन्य नसलेली याअर्थी मुलींचे एक नाव ३१. आई-वडील ३२. अवधान, लक्ष ३४. नरमांजर ३६. आशीर्वाद ३७. मनोबल ३८. होडी ४०. गर्जना, आरोळी ४१. अस्सल ४४. हिस्सा ४५. रसाचा आंबा ४७. 'मनसे'चे ठाकरे ४९. टप्प्या-टप्प्याचा प्रवास ५०अ. चाणक्यनीतीनुसार शेवटचे दोन उपाय ५२. भावा-भावांची आदर्श जोडी ५३. जाडसर पीठ ५५. दृष्ट, पक्का ५६. छोटा माठ ५७. आभार ५९. छोटी बैलगाडी ६१. रविवासर ६४. दया येण्याजोगी स्थिती ६५. चेहऱ्यावरची रेषही न हलवता

शब्दकोडे १५० चे उत्तर

आडवे उत्तर

१.कवडीचुंबक ५.कस ७.त्रिशूल ९.रसा ११.पार १२.दार १३.छापखाना १४.बातमी १६.डझन १९.क्षीण २०.कळकट २१.समजूतदार २५.तालेवार २७.म ुकुट २८.टाच ३०.साज ३२.पनीर ३४.पहिलवान ३६.हळवा ३८.दरा ४०.झेला ४१.गरूड ४२.सत्यवान ४४.दाब ४५.क्ष ४६.मार ४७.कुकर ४८.सासर ५०.प्रथा ५१.भोळा ५२.मगरमिठी ५५.क्षणप्रभा ५६.दाट ५७.राणीव ५८.कैरी ५९.तकवा ६१.दक्ष ६२.तप ६४.नाक ६५.वैगुण्य ६७.सदा ६९.वरात ७१.अभूतपूर्व ७२.वामन ७४.लक्षण ७६.ब्र ७७.सनद ७८.बाग ७९.पूल ८०.झुणका ८१.अनल ८२.तूप ८३.क्षौर

उभे उत्तर

१.कपाळकरंटा २.वर ३.चुंदा ४.बरड ५.कप ६.सखाराम ८.शूर ९.रत १०.सामील १३.छान १४.बाण १५.चिकट १७.झबले १८.च्युत १९.क्षीर २१.सर २२.जून २३.दामिनी २४.मुकुल २५.ताजवा २६.वाणी २९.चपला ३०.सालस ३१.बळ ३३.रदन ३५.नगर ३६.हडकुळा ३७.वासरमणी ३९.खबरदारी ४०.झेप ४३.वावर ४४.दास ४६.माथा ४८.साठी ४९.क्षणभंगुर ५०.प्रभात ५१.भोट ५३.गवत ५४.मिथ्या ५६.दावा ५७.राक्षस ५८.कैक ६०.कर्णभूषण ६३.पवन ६४.नातलग ६६.हापूस ६८.दावानल ७०.सणवार ७३.मद ७५.शेपू ७७.सन ७८.बाप

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय**- बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
नंदुरबार कार्यालय - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

एकाग्रतेने ध्येयाकडे वाटचाल करा, यश नक्की मिळेल

पोलिस आयुक्त अंकुश शिंदे यांचे आवाहन

कॉलेजरोड, गंगापूररोड वाणी मित्र मंडळातर्फे 'शिक्षणविश्व २०२३'ला प्रतिसाद

नाशिक । प्रतिनिधी

बऱ्याच वेळा स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या युवक-युवती अनेक त्याग करतात, खुप वेळा परीक्षेला सामोरे जातात. तरीदेखील त्यांना यश मिळत नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे एकाग्रतेचा अभाव त्यांच्यात असतो. ध्येयाकडे एकाग्र चित्ताने वाटचाल केल्यास यश हमखास मिळेल, असे आवाहन पोलिस आयुक्त अंकुश शिंदे यांनी केले.

गंगापूर रोडवरील केबीटी अभियांत्रिकी महाविद्यालय सभागृहात कॉलेजरोड, गंगापूररोड वाणी मित्र मंडळाच्या वतीने आयोजित 'शिक्षण विश्व २०२३' कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.

याप्रसंगी निफाडच्या उपविभागीय अधिकारी हेमांगी पाटील, सायबर सल्लागार ॲड. स्वरदा कबनूरकर, आयटीआयचे निवृत्त प्राचार्य दत्तात्रय आहेर यांच्यासह कार्यक्रमाचे निमंत्रक व मंडळाचे अध्यक्ष संजय दुसे, संस्थापक अध्यक्ष नितीन दहिवेलकर, विश्वस्त योगेश मालपुरे, योगेश राणे, संजय बागड, प्रविण अमृतकर, महेश पितृभक्त, राजेंद्र कोठावदे, नीलेश मकर, हितेश देव, भगवंत येवला, ड. देवदत्त जायखेडकर आदी उपस्थित होते. यावेळी गौरांगी येवला आणि आयुष वाणी या विद्यार्थ्यांना यश पुरस्काराने सन्मानित केले. तर विकास अमृतकर यांचा विशेष सत्कार केला.

पोलिस आयुक्त अंकुश शिंदे पुढे म्हणाले, एखादी व्यक्त यशस्वी होण्यामागे त्याचा संकल्प महत्त्वाचा असतो. जसे आपण विचार करतो, तसे आपण घडत जातो. त्यामुळे सकारात्मक विचार घेऊन जीवनात वाटचाल करणे महत्त्वाचे असते.

हेमांगी पाटील म्हणाल्या, जागे राहून पाहिलेले स्वप्न व हे स्वप्न पूर्ण करण्याची इच्छा मनात असणे आवश्यक असते. कुठलेही क्षेत्र, नोकरी, व्यवसायाचा पर्याय निवडून त्यात सर्वोत्तम कामगिरीचा ध्यास ठेवा. आपला स्वभाव, आवडी-निवडी, आपल्याकडील कौशल्ये आदींचा विचार करुन करिअरचा पर्याय निवडावा. असे सांगतांना त्यांनी एमपीएससी व युपीएससी या परीक्षांची रचना, तयारीसाठी महत्त्वाचे मुद्दे विशद केले.

दत्तात्रय आहेर म्हणाले, आजचे युग तंत्रज्ञानाचे असून, कौशल्यांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कौशल्याधीष्ठीत शिक्षणक्रमांवर भर द्यावा. कौशल्ये आत्मसात करतांना उज्ज्वल करिअर घडविण्याचा सल्ला त्यांनी दिला.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अमोल शेंडे, पवन बागड, हर्षद चिंचोरे, प्रशांत मोराणकर, अविनाश कोठावदे, सुधीर नावरकर, चेतन येवला, राकेश ब्राह्मणकर यांनी परिश्रम घेतले.

डिजीटल युगात करिअरच्या व्यापक संधी- ॲड.कबनूरकर

तंत्रज्ञानाचा वापर वाढत असतांना, अनेक आव्हाने वाढत आहेत. या समस्या हाताळण्यासाठी इथिकल हॅकर, फॉरेन्सिक तज्ज्ञ यासह अन्य विविध करिअरच्या संधी उपलब्ध असल्याची माहिती ॲड.स्वरदा कबनूरकर यांनी दिली. आर्थिक, सामाजिक, वैयक्तिक पातळीवरील आव्हाने तसेच आपली फसवणूक होण्यापासून रोखण्यासाठी काय उपाययोजना कराव्या, याचीही माहिती त्यांनी दिली.

राष्ट्रसंत भगवान बाबा राष्ट्रीय जंयती उत्सव समितीच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी बाळासाहेब घुगे

नाशिक । नाशिक येथील ज्येष्ठ समाजसेवक बाळासाहेब घुगे यांच्या कार्याची दाखल घेवून राष्ट्रसंत भगवान बाबा राष्ट्रीय जंयती उत्सव समितीचे अध्यक्ष शशिकांत घुगे यांनी त्यांची निवड राष्ट्रसंत भगवान बाबा राष्ट्रीय जंयती उत्सव समितीच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी केली आहे. या निवडीबद्दल संबंध महाराष्ट्रातून बाळासाहेब घुगे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राष्ट्रसंत भगवान बाबा, संत वामनभाऊ, संत आवजीनाथ महाराज, स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंती तसेच पुण्यतिथी विविध सामाजिक उपक्रम हाती घेऊन राज्य, देशभरातील गावोगाव, वाडी-वस्ती, तांड्यावर साजरी करण्यासाठी व्यापक जनजागृती करण्यासाठी राष्ट्रीय जंयती उत्सव समिती गठित झाली आहे. यामध्ये समाजसेवक बाळासाहेब घुगे यांच्यावर राष्ट्रीय उपाध्यक्ष व जिल्हा प्रभारी नाशिक ही जबाबदारी देण्यात आली आहे. नाशिक येथे ऐतिहासिक अविस्मरणीय ठरेल अशी जंयती साजरी करण्यासाठी बाळासाहेब घुगे यांनी कंबर कसली आहे.

जिल्हा परिषदेत ध्वजारोहण उत्साहात

नाशिक । प्रतिनिधी

नाशिक जिल्हा परिषदेचा ध्वजारोहण प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शासकीय कन्या विद्यालयाच्या बँड पथकाच्या विद्यार्थिनींनी राष्ट्रगीत, राज्यगीत आणि झेंडागीत सादर केले.

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अर्जुन गुंडे, प्रकल्प संचालक प्रतिभा संगमनेरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी भालचंद्र चव्हाण, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) रवींद्र परदेशी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) वर्षा फडोळ, जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक दीपक पाटील, कार्यकारी अभियंता संदीप सोनवणे, कार्यकारी अभियंता संदीप मेतकर, कार्यकारी अभियंता शैलजा नलावडे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी योगेश पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे, जिल्हा पशु संवर्धन अधिकारी डॉ. संजय शिंदे, कृषी विकास अधिकारी कैलास शिरसाठ, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) नितीन बच्छाव, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रवीण पाटील, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. हर्षल नेहेते, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दीपक लोणे, गटविकास अधिकारी (नरेगा) नयन पाटील, गटविकास अधिकारी (ग्राप) प्रशांत पवार, उपशिक्षणाधिकारी भास्कर कनोज, उपशिक्षणाधिकारी धनंजय कोळी, लेखाधिकारी रमेश जोंधळे, लेखाधिकारी प्रकाश बानकर, शासकीय कन्या विद्यालयाच्या शिक्षिका कविता साठे, शिक्षक सुनील वाघ यांच्यासह जिल्हा परिषदेचे सर्व अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. तर जिल्हा परिषदेच्या मुख्य इमारतीस अतिशय आकर्षक अशी विद्युत रोषणाई बांधकाम विभागाकडून करण्यात आली होती.

स्वातंत्र्यदिनी भाजपाची तिरंगा बाईक रॅली

नाशिक । प्रतिनिधी

भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त भारतीय जनता पार्टी नाशिक महानगराच्यावतीने शहीद सर्कल, गंगापूररोड येथील स्मृतिस्थळी शहिदांना पुष्पांजली अर्पण करून तिरंगा बाईक रॅलीची सुरुवात करण्यात आली.

या तिरंगा बाईक रॅलीमध्ये मंत्री गिरीश महाजन यांसह भाजपाचे शहराध्यक्ष प्रशांत जाधव, आ.सीमा हिरे, आ.देवयानी फरांदे, आ.राहुल ढिकले, लक्ष्मण सावजी, विजय साने, गिरीश पालवे, माजी महापौर सतीश कुलकर्णी, रंजना भानसी, पवन भगूरकर, सुनील केदार, जगन पाटील, महेश हिरे, देवदत्त जोशी, भास्कर घोडेकर, अविनाश पाटील, भगवान काकड, चंद्रशेखर पंचाक्षरी, अमित घुगे, योगेश मैंद, अनिकेत पाटील, डॉ.वैभव महाले, मुकेश शहाणे, विजय बनछोडे, सागर शेलार, हर्षद जाधव, रश्मी हिरे, सुरेश पाटील आदी सह कार्यकर्ते सहभागी झाले होते.

ॲड.एफ. बी. शेख
निशाणी नं.- ७/ड

जाहिर नोटीस

धुळे येथील मे. ७ वे प्रथमवर्ग मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात

फौजदारी किरकोळ अर्ज नं.:- ७४३ / २०२३

१) गौरव शामकांत गुजर (पटेल), वय-३०, धंदा-शेती,
२) नियती गौरव पटेल, वय-५, धंदा-निरंक
दोघे रा.मोहाडी प्र.डांगरी ...अर्जदार

विरुध्द

म. ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मोहाडी प्र. डांगरी ता. जि. धुळे ...सामनेवाला

(नियती गौरव पटेल जन्म दि. २०/०६/२०१८)

ज्या अर्थी अर्जदार क्र. १ व २ यांनी अर्जदार क्र. २ नामे नियती गौरव पटेल हीच्या जन्माच्या तारखेची नोंद जन्म-मृत्यु च्या रजिस्टरमध्ये घेवुन तसा जन्म दाखला अर्जदारास देण्यात यावा यासाठी धुळे येथील मे. न्यायदंडाधिकारी सो. प्रथम वर्ग यांचे न्यायालयात दि. ०९/०८/२३ रोजी फौ. की. अर्ज नं. ७४३ / २०२३ चा जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे जन्माची नोंद करण्याबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशी कामकाज चालविणेकरीता दि. १८/०९/२०२३ रोजी निश्चित केले आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस वगैरे संबंधितांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद, हरकत असल्यास धुळे येथील न्यायदंडाधिकारी सो. प्रथम वर्ग धुळे यांच्या न्यायालयात उक्त निश्चित केलेल्या तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन तकार करावी. त्याअर्थी मे. न्यायालयाने निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही तक्रार उपस्थित झाली नाही. तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर नोटीस मे. न्यायालयाचे शिक्क्यानिशी आमचे सहीनिशी प्रसिध्दीस दिली असे.

धुळे
दि.११/०८/२०२३ आदेशावररुन

कामगिरी कारकुन (ज्युडि. मॅजि. सो. वर्ग-१ धुळे) (शिक्का) सहा.अधीक्षक (ज्युडि. मॅजि. सो. वर्ग-१ धुळे)

निशाणी नं.- ६

जाहिर नोटीस

धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं.९९४/२०२३

१. निबा अंकुश पाटील वय-५४ वर्ष, कांमधदा-शेती
२. सुनिल अंकुश पाटील वय-५२ वर्ष, कांमधदा-शेती
अर्जदार क्र १ व २ रा. डांबली धादरणे ता शिदखेडा जि धुळे
३. अनिल अंकुश पाटील वय-५० वर्ष, कामधंदा-मजुरी
४. उषाबाई किशोर पाटील वय-५६ वर्ष, कामधंदा-घरकाम
अर्जदार क्र ३ व ४ रा. रत्नाप्रभा सोसायटी उधना सुरत गुजरात ...अर्जदार

विरुध्द

कै. सुमनबाई अंकुश पाटील (मयत) मृत्यु दिनांक १०/५/२०२१ मुत्यु ठिकाण - डांबली ता शिदखेडा जि धुळे

ज्याआर्थी अर्जदार याने धुळे येथील मे. सह दिवाणी न्यायाधिश सो. व. स्तर यांचे न्यायालयात दि. ८/८/२०२३ रोजी दि. कि. अर्ज. नं. ९९४/२०२३चा अर्ज दाखल केलेला आहे ज्याअर्थी अर्जदार यांनी कै. सुमनबाई अंकुश पाटील (मयत)याचे अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत असे घोषित होवुन मिळण्यासाठी व अर्जदार याना सदर वारस दाखला हा मयताच्या सामाईक नावावर असलेल्या मौजे अकलाड ता जि धुळे येथिल गट क्र ४४४ त्यास क्षेत्र ० हे. ५० आर त्यास आकारणी १ रू ५५ पैसे आहे या शेत मिळकतीवर मयताचे वारस म्हणुन नाव लावण्यासाठी अर्जदार वारस दाखला लागणार आहे व इतर शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणर आहे. म्हणुन अर्जदार यानी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो क. स्तर यांच्या न्यायालयात अर्जदार क्र. १ ते ४ याच्या नावाने वारस दाखला मिळणेकरीता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. २५/०९/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे.सह दिवाणी न्यायाधिश सो. व.स्तर कोर्ट नं.-, यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- १०/८/२०२३ आदेशावररुन

व.लिपीक मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं. (शिक्का) अधीक्षक मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.

निशाणी नं.- ६

जाहिर नोटीस

धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं. ९९३/२०२३

१) भिकुबाई भगवान पाटील उ.वय.:-६८ वर्ष,कामधंदा-घरकाम
२) विजय भगवान पाटील उ.वय.:- ४७ वर्ष, कामधंदा-शेती
३) प्रमोद भगवान पाटील उ.वय.:- ४७ वर्ष, कामधंदा-शेती
४) शरद भगवान पाटील उ.वय.: - ४५ वर्ष, कामधंदा-शेती
५) प्रशांत भगवान पाटील उ. वय: ३८, वर्ष, कामधंदा-शेती
अर्जदार क्र १ ते ५ रा. नगाव ता जि धुळे
६) मनिषा कमलाकर पाटील उ.वय.:-४२ वर्ष,कामधंदा-घरकाम रा. अमळनेर ता अमळनेर जि जळगाव ...अर्जदार

विरुध्द

कै.भगवान चैत्राम पाटील (मयत) मृत्यु दिनांक २३/४ /२०२१ मुत्यु ठिकाण नगाव ता जि धुळे ...सामनेवाला

ज्याआर्थी अर्जदार याने धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे न्यायालयात दि.०८/०८/२०२३ रोजी दि. कि. अर्ज. नं. ९९३/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी अर्जदार यांनी कै. भगवान चैत्राम पाटील (मयत) याचे अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत असे घोषित होवुन मिळण्यासाठी व अर्जदार याना सदर वारस दाखला हा शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे.म्हणुन अर्जदार यानी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो क. स्तर यांच्या न्यायालयात अर्जदार क्र. १ ते ६ याच्या नावाने वारस दाखला मिळणेकरीता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. २५/९/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर कोर्ट नं. १, यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थ मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- १०/८/२०२३ आदेशावररुन

कामगिरी कारकुन मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं. (शिक्का) अधीक्षक मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.

ॲड. पल्लवी पी. गायकवाड
निशाणी नं.- ६

जाहिर नोटीस

धुळे येथील मे.५ वे सह दिवाणी न्यायाधीश सो. क. स्तर यांचे न्यायालयात

दि. कि. अर्ज नं.९९८/२०२३

१) नाना उत्तम पगारे
२) सिताराम उत्तम पगारे
३) बापु उत्तम पगारे
४) झिंगु उत्तम पगारे
५) बेबाबाई ओमकार चव्हाण
६) शोभाबाई सयाजी मोरे
७) विमलबाई रोहिदास निकम
८) आशाबाई जगन निकम ...अर्जदार

विरुध्द

कै. सारजाबाई बाप झिपरू सोनवणे मृत्यु दि. २८/०५/२०१२ ...जाबदेणार

वारस दाखला मिळणेसाठी

ज्याअर्थी सदरचा अर्ज अर्जदार नं. १ ते ८ यांनी ते कै. सारजाबाई बाप झिपरू सोनवणे रा.मु.पो.सिताणे ता. जि. धुळे यांचे कायदेशीर वारस म्हणुन वारस दाखला मिळण्यासाठी या मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्या अर्थी जर कोणत्याही व्यक्तीस काहीही हरकत असेल तर त्यांनी वर नमुद अर्जाचेकामी दि. ०७/१०/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजेच्या सुमारास मे. कोर्टात व्यक्तीशः व आपल्या वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे/हरकत नोंदवावी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- १४/०८/२०२३ आदेशावररुन

कामगिरी कारकुन सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग धुळे (शिक्का) अधीक्षक सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग धुळे

ॲड. स्वप्निल सुरेश सोंजे
निशाणी नं.- ६

जाहिर नोटीस

धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) सो. यांचे कोर्टात

दि.कि. अर्ज नं. ९९२/२०२३

कमला प्रकाश चोपडा वगैरे ...अर्जदार

विरुध्द

कोणीही नाही

(कै. प्रकाश ताराचंद चोपडा -मयत) वगैरे ...जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) सो. यांचे न्यायालयात दि. ८/८/२०२३ रोजी दि. कि. अर्ज नं. ९९२/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी अर्जदार यांनी कै. प्रकाश ताराचंद चोपडा यांचा वारस दाखला मिळणेकरीता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ. दि.२७/०९/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते. याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे.सह दिवाणी न्यायाधीश सो. क.स्तर कोर्ट नं. ९ यांचे न्यायालयात उक्त निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण-धुळे
दिनांक :- १०/०८/२०२३ आदेशावररुन

कामगिरी कारकुन मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं. (शिक्का) अधीक्षक मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.

ॲड. स्वप्निल सुरेश सोंजे
निशाणी नं.- ६

जाहिर नोटीस

धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) सो. यांचे कोर्टात

दि.कि. अर्ज नं. ९८८/२०२३

छायाबाई अशोक पारधी वगैरे ...अर्जदार

विरुध्द

कोणीही नाही

(कै. अशोक अर्जुन पारधी - मयत) वगैरे ...जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) सो. यांचे न्यायालयात दि. ८/८/२०२३ रोजी दि. कि. अर्ज नं.९८८/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी अर्जदार यांनी कै. अशोक अर्जुन पारधी यांचा वारस दाखला मिळणेकरीता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ. दि. ०७/१०/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. सह दिवाणी न्यायाधीश सो. क स्तर कोर्ट नं. ५. यांचे न्यायालयात उक्त निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण-धुळे
दिनांक :- १०/ ०८/२०२३ आदेशावररुन

कामगिरी कारकुन मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं. (शिक्का) अधीक्षक मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.

ॲड. स्वप्निल सुरेश सोंजे
निशाणी नं.- ६

जाहिर नोटीस

धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) सो. यांचे कोर्टात

दि.कि. अर्ज नं. ९९५/२०२३

नाना शामजी पाटील वगैरे ...अर्जदार

विरुध्द

कोणीही नाही

(कै. रूखमाबाई राघो पाटील - मयत) वगैरे ...जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) सो. यांचे न्यायालयात दि. ९/८/२०२३ रोजी दि. कि. अर्ज नं. ९९५/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी अर्जदार यांनी कै. रूखमाबाई राघो पाटील, कै. राघो धर्मा पाटील, कै. नागो धर्मा पाटील, कै. शामजी नागो पाटील यांचा वारस दाखला मिळणेकरीता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मे.न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ. दि.२१/०९/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. क.स्तर कोर्ट नं. २. यांचे न्यायालयात उक्त निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण-धुळे
दिनांक -१४/८/२०२३ आदेशावररुन

कामगिरी कारकुन मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं. (शिक्का) अधीक्षक मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.

जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी शासन कटीबद्ध

सार्वजनिक बांधकाम मंत्री दादाजी भुसे यांच्या उपस्थितीत स्वातंत्र्य दिन सोहळा उत्साहात संपन्न

धुळे । प्रतिनिधी

जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासोबत नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी राज्य शासनाने एक वर्षांच्या कालावधीत सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी अनेक लोकाभिमुख निर्णय घेतले असल्याचे प्रतिपादन राज्याचे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री दादाजी भुसे यांनी केले आहे.

ते आज भारतीय स्वातंत्र्याच्या ७६ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित मुख्य ध्वजारोहण समारंभात जिल्हावासीयांना शुभेच्छा देताना बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अश्विनी पवार, महापौर प्रतिभाताई चौधरी, आमदार मंजुळाताई गावित, स्थायी समिती सभापती भारती भामरे, जिल्हाधिकारी अभिनव गोयल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता, जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, उपवनसंरक्षक नितीन सिंग, मनपा आयुक्त देविदास टेकाळे, अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण, निवासी उपजिल्हाधिकारी नितीन गावंडे, सहायक पोलीस अधिक्षक एस. ऋषिकेश रेड्डी, उपजिल्हाधिकारी तुकाराम हुलवळे, अरविंद अंतुर्लीकर, महेश जमदाडे, सुरेखा चव्हाण, जिल्हा पुरवठा अधिकारी महेश शेलार, जिल्हा सैनिक अधिकारी मेजर डॉ. निलेश पाटील, माजी आमदार शरद पाटील, माजी महापौर प्रदीप कर्पे आदी उपस्थित होते.

यावेळी मंत्री श्री. भुसे म्हणाले की, आपल्या राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील सरकारने राज्याच्या सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी अनेक निर्णय घेतले आहे. यात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत आरोग्य संरक्षणात प्रति कुटुंब प्रति वर्ष ५ लक्ष एवढी वाढ केली असून राज्यातील सर्व शिधापत्रिकाधारक कुटुंबे व अधिवास प्रमाणपत्रधारक कुटुंबांना पाच लाखापर्यंतचा उपचाराचा लाभ मिळणार आहे. केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या धर्तीवर राज्य शासनाने 'नमो शेतकरी महासन्मान ' योजना सुरु केली आहे. या योजनेच्या माध्यमातून आता दरवर्षी सहा हजार रुपयांचा लाभ पात्र शेतकऱ्यांना मिळणार आहे. 'सर्वांसाठी घरे-२०२४' हे राज्य शासनाचे धोरण असून, त्यानुसार बेघर तसेच कच्च्या घरात वास्तव्यास असणाऱ्या ग्रामीण भागात वास्तव्यास असणाऱ्या इतर मागास प्रवर्गातील पात्र कुटूंबांना घरकुल योजनेचा लाभ देण्यासाठी 'मोदी आवास घरकुल योजना' राबविण्यात येत आहे.

वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे मनुष्य मृत्यू, अपंगत्व, गंभीर जखमी व किरकोळ जखमी झाल्यास द्यावयाच्या अर्थसहाय्यात नुकतीच वाढ करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना शेतीपंपांना दिवसा अखंडीत व शाश्वत वीजपुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०, अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांना त्यांच्या शेतामध्ये धरणातील गाळ नेण्यासाठी गाळमुक्त धरण, गाळमुक्त शिवार योजना, कृषि क्षेत्रातील सिंचन क्षेत्र वाढविण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान २.०, राज्यातील ७५ वर्षांवरील जेष्ठ नागरिकांना एसटीचा मोफत प्रवास तसेच महिलांना एसटीच्या प्रवास भाड्यात ५० टक्के सवलत, अतिवृष्टी आणि पुराच्या पाण्यामुळे नागरिकांच्या घरांचे आणि मालमत्तेचे नुकसान झालेल्या आपत्तीग्रस्तांना वाढीव दराने आर्थिक मदत, शेतजमिनीचा ताबा व वहिवाटीबाबत शेतकऱ्यांमधील आपआपसातील वाद मिटविण्यासाठी सलोखा योजना, अनुसूचित जमातीच्या गुणवंत विद्यार्थ्यांसाठी प्रोत्साहनपर बक्षिस योजना असे अनेक हिताचे निर्णय राज्य शासनाने घेतले आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजने अंतर्गत जानेवारी २०२३ पासून ५४ हजार १९९ टन धान्यांचे मोफत वितरण करण्यात आले आहे. 'शासन आपल्या दारी' या अभियानात धुळे जिल्ह्यात ३ लाख २१ हजार १७९ लाभार्थ्यांना ६८ कोटी रक्कमेचा लाभ देण्यात आला आहे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजनेअंतर्गत धुळे शहरात १६ आरोग्य केंद्र स्थापन केले आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सर्व शासकीय रूग्णालयात रुग्णांना देण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या वैद्यकीय सेवा आज पासून नि:शुल्क उपलब्ध होणार आहेत.

प्रधानमंत्री आवास योजनेतंर्गत ५६ हजार ९०४ घरकूल पूर्ण झाले आहे. शबरी आवास योजनेंतर्गत ३ हजार ४२३ तर रमाई आवास ग्रामीण योजनेतंर्गत २ हजार ९९३ घरकुलांना मंजूरी देण्यात आली आहे. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातंर्गत नोंदणीकृत बांधकाम कामगारांना विविध योजनांचा लाभ देण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत आपल्या धुळे जिल्ह्यातील साक्री- सटाणा- देवळा- चांदवड- मनमाड- येवला- कोपरगाव- शिर्डी या महामार्गावरील ४२.५७६ किलोमीटर लांबीच्या रस्त्यासाठी २७७.८२ कोटी रुपयांची मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पातंर्गत ३६ किलोमीटरचे काम पूर्ण झाले असून उर्वरीत कामे ३१ जानेवारी, २०२४ पर्यंत पूर्ण होणार आहे.

यावर्षी जिल्ह्यात पावसाचे प्रमाण कमी आहे. जिल्ह्यात आतापर्यंत सरासरीच्या ७५ टक्के पाऊस झाला असून पावसाचा आणखी दीड महिना कालावधी शिल्लक आहे. या कालावधीत चांगला पाऊस झाल्यास जिल्ह्यातील लहान-मोठे प्रकल्प भरल्यास पाणी टंचाई दूर होईल. यंदाच्या खरीप हंगामात ३ लाख ७५ हजार हेक्टर क्षेत्रात विविध पिकांचा पेरा झाला आहे. प्रत्येक नागरिकाने पाण्याचे महत्व ओळखुन पाण्याचा काटकसरीने वापर करावा असे आवाहन त्यांनी जिल्हावासीयांना केले.

यांचा झाला सन्मान

भारतीय स्वातंत्र्याचा ७६ व्या वर्धापन दिनानिमित्त भारतीय सैनिक म्हणून देशाचे संरक्षण करीत असतांना शहीद झालेल्या मु.न्याहळोद येथील हवालदार शहीद मनोहर रामचंद्र पाटील यांच्या वीर पत्नी श्रीमती माया मनोहर पाटील, तसेच मु. चिंचखेडा येथील नायक मनोज लक्ष्मण गायकवाड यांच्या वीर पत्नी श्रीमती रुपाली मनोज गायकवाड यांना मंत्री महोदयांच्या हस्ते सन्मानपूर्वक ताम्रपट व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच 'मेरी माटी, मेरा देश' उपक्रमांतर्गत चित्रकला स्पर्धेत प्रथम आलेल्या चि. सिद्धांत मनोज मराठे, इयत्ता दुसरी, जिल्हा परिषद शाळा, बाळापूर, तसेच चि.अर्णव सुनिल कुलकर्णी इयत्ता पाचवी कनोसा कॉन्व्हेंट हायस्कुल, धुळे या विद्यार्थ्यांना मंत्री महोदयांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

महाराष्ट्र गीताने दुमदुमला परिसर

आजच्या वर्धापन दिनाचे वैशिष्ट्य म्हणजे आशयपूर्ण, स्फुर्तीदायक आणि राज्याच्या थोर आणि शूर परंपरांची गाथा सांगणारे कवीवर्य श्री. राजा निळकंठ बढे यांची रचना असलेले 'जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा' हे महाराष्ट्राचे राज्यगीत म्हणून राष्ट्रगीता सोबत जिल्हाधिकारी कार्यालयाचा परिसर दुमदुमून गेला होता.

उत्तमराव पाटील महाविद्यालयात स्वातंत्रदिन उत्साहात साजरा

दहिवेल । मेरी मिट्टी मेरा देश हर घर तिरंगा या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव निमित्ताने १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट पर्यंत उत्तमराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय व दादासाहेब माणिकराव पाटील कनिष्ठ महाविद्यालयात ध्वजारोहण करून विविध उपक्रमांनी साजरा केला.

दि १३ ऑगस्ट रोजी इ ११ वीत प्रथम आलेली विद्यार्थिनी कल्याणी चौधरी च्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. दिनांक १४ रोजी भारतीय सेनेत २० वर्ष सेवा बजावलेले सैनिक दिनेश खैरनार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. दि १५ ऑगस्ट रोजी माणिकराव पाटील यांच्या समाधी स्थळी व पुतळ्याला ला संस्थेचे संचालक व ग्रामस्थांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर भारतीय सैन्यात शाहिद झालेले व विविध आपत्तीमध्ये ज्यांनी जीव गमावला त्या सर्वांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करून संस्थेच्या संचालिका सुनंदा अरविंद पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी गावातील जेष्ठ नागरिक, ग्रामस्थ व नवोदय शैक्षणिक संस्थेची संचालक वसंतराव बच्छाव, कृपेश नांद्रे, सत्यजित पाटील उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

श्री छत्रपती शिवाजी इंग्लिश मिडीयम स्कूल

साक्री । प्रतिनिधी

येथील श्री छत्रपती शिवाजी इंग्लिश मिडीयम स्कूल मधे सेवानिवृत्त आर्मी सैनिक राजेंद्र आहिरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करत विद्यार्थ्यांच्या कवायती, गीत, नृत्ये, भाषणं व घोषणा देत स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमास प्रमूख पाहूणे म्हणून संस्थेचे चेअरमन प्रभाकर चौधरी,संचालक प्रा.एल् जी सोनवणे,प्राचार्य बी.एम् भामरे, शालेय समितींचे कार्यकारिणी सदस्य व पालकांना मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मेंढपाळ बांधवानी वाड्या वस्तीमध्ये साजरा केला स्वातंत्र्य दिन

जैताणे । प्रतिनिधी

येथे मेंढपाळ बांधवानी एक अनोखा अमृत महोत्सव साजरा केला. जैताणे गावातील मेंढपाळ बंधूंनी एका वाड्या वस्तीमध्ये राहणारे उन्हा ताणात राणा वनात आपल्या उदरनिहा भागवण्यासाठी भटकंती करत असणारे देशाबद्दल प्रेम आपुलकी दाखवत मेंढपाळ बंधूनी अनोख्या पद्धतीने स्वातंत्र्य दिन साजरा केला.

यावेळी उपस्थित वडिलोपार्जित मेंढपाळ हा पेशा असलेला भारतीय जनता पार्टीचे जैताणे शहर अध्यक्ष भूषण न्याहाळदे धनराज भगत गुड्डू भलकारे ज्ञानेश्वर शिंदे तात्या बोरसे तुकाराम बोरसे पांडू मुजगे युवराज भलकारे प्रताप भलकारे भगवान भलकारे आधी मेंढपाळ बांधव उपस्थित होते.

स्व.तपनभाई पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त आज विविध कार्यक्रम

शिरपूर । श्री विले पार्ले केळवाणी मंडळ मुंबई संस्थेचे ट्रस्टी, आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्टचे उपाध्यक्ष, शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे संचालक, शिरपूर वरवाडे नगर परिषदेचे नगरसेवक तथा बांधकाम सभापती, शिरपूर टेक्सटाईल पार्क चेअरमन, दिसान ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे सह-कार्यकारी संचालक अशी अनेक पदे भूषविलेले स्व. तपनभाई मुकेशभाई पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त १७ ऑगस्ट २०२३ रोजी महावृक्षारोपण, महारक्तदान शिबिर व विविध कार्यक्रम व स्मृती सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

तपनभाई फ्रेंड सर्कल, मुकेशभाई पटेल चॅरिटेबल ट्रस्ट व भूपेशभाई ग्रीन आर्मीच्या संयुक्त विद्यमाने अतिशय भव्यदिव्य असा वृक्षारोपण स्मृती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून असली ता. शिरपूर येथे दुपारी ३ वाजता हजारो वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. तसेच शिरपूर टॅक्सटाईल पार्क येथे सकाळी ६ वाजेपासून महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर आर. सी. पटेल शैक्षणिक संकुलाच्या विविध प्रांगणांमध्ये ११ हजार वृक्ष लागवड, काही गरजू विद्यार्थ्यांना गणवेश वाटप तसेच काही ठिकाणी अन्नदान व विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

साईकला बहुद्देशीय संस्था व ईलाईट क्लब धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने अन्नदान

स्वातंत्र्य दिना निमित्त उपक्रमाचे आयोजन

धुळे । प्रतिनिधी

साईकला बहुद्देशीय संस्था धुळे व ईलाईट क्लब धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने १५ ऑगस्ट निमित्ताने अन्नदान उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच अस्थिव्यंग दिव्यांग निवासी शाळा नगाव व आनंद विहार वृद्धाश्रम येथे भेट दिली.

ईलाईट क्लब नेहमीच विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करत असते. त्यासोबतच साईकला संस्था बऱ्याच वर्षापासून कलाक्षेत्रातील नवोदित कलाकारांना नेहमी मदत करत असते.

यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रसाद सोनवणे , इलाईत क्लब चे संस्थापक अध्यक्ष तेजस शिरसाठ , सुशीला शिरसाठ, दै.लक्ष महाराष्ट्रचे मुख्य उपसंपादक पुरुषोत्तम पाटील, सुनीता सोनवणे, श्रेयस शिरसाठ , सोहम कोळी, साक्षी कोळी आदी उपस्थित होते.

भारत चौधरी यांचा राष्ट्रीय शिक्षा रत्न पुरस्काराने गौरव

जैताणे । प्रतिनिधी

रियल इंडो ग्लोबल व्हिजन सोशल डेव्हलपमेंट, गुरुकुल फाउंडेशन या राष्ट्रीय संस्थेतर्फे जैताणे ता. साक्री जि.धुळे येथील व शासकीय आश्रमशाळा लोय ता. जि. नंदुरबार येथील माध्यमिक शिक्षक भारत मगन चौधरी यांना राष्ट्रीय स्तरावरील राष्ट्रीय शिक्षा रत्न पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. नूतन मराठा महाविद्यालय जळगाव येथे आयोजित राष्ट्रीय परिषदेत उपस्थित मान्यवरांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

भारत चौधरी सर यांनी शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, राष्ट्रीय व पर्यावरण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.

भारत चौधरी हे पंधरा वर्षापासून अध्यापन क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांनी इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठ, दिल्ली अंतर्गत बी. एड. प्रशिक्षणार्थ्यांचे मार्गदर्शक व यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक अंतर्गत शालेय व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रमाचे मार्गदर्शक व परीक्षक म्हणून काम केले. विविध राष्ट्रीय परिषदेत सहभाग, विविध प्रशिक्षणात साधन व्यक्ती म्हणून ही कामकाज केले आहे.

पुरस्कार वितरण प्रसंगी मंचावर स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ नांदेड चे ख्यातनाम संशोधक डॉ. सूर्यकांत थोरात अध्यक्षस्थानी होते. राष्ट्रीय निवड समितीचे प्रमुख प्राचार्य डॉ. मनोहर पाटील, कार्याध्यक्ष डॉ. प्रमोद पवार, सिनेट सदस्य डॉ. दिलीप रामू पाटील, पंजाब प्रांत समितीचे अध्यक्ष डॉ. गुरुप्रीत सिंह, दिल्ली समिती प्रमुख डॉ. योगेश गुप्ता, उत्तर प्रदेश समिती प्रमुख डॉ. दिनकर त्रिपाठी, केरळ समिती प्रमुख डॉ. मोहम्मद रियाज, मध्य प्रदेश समितीचे प्रमुख डॉ. सुनील गोयल, हरियाणा समितीचे प्रमुख डॉ. रीनाजी, छत्तीसगड समितीचे प्रमुख डॉ. शिल्पी बोस, डॉ. महेंद्र रघुवंशी, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. सचिन नांद्रे, डॉ. लियाकत खान मुंबई, डॉ. रवी काक्रांबे, डॉ. एल. पी. देशमुख, डॉ. प्रवीण पाटील, डॉ. मोहन पावरा, डॉ. दीपक पाटील आदी उपस्थित होते.

सदर पुरस्कार मिळाल्याबद्दल जैताणे व मालपूर गावातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व प्रशासकीय क्षेत्रातील विविध पदाधिकारी, मित्र परिवार व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नंदुरबारचे मा. प्रकल्प अधिकारी सो. प्रकल्पातील विविध पदाधिकारी, आश्रम शाळेतील मुख्याध्यापक, अधिक्षक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

भारत चौधरी सर हे पाटबंधारे खात्यातील सेवानिवृत्त कर्मचारी श्री. मगन जयराम चौधरी यांचे चिरंजीव आहेत व अहिल्यादेवी विणकाम सोसायटीचे चेअरमन श्री. छोटू जयराम न्याहळदे व जिल्हा परिषद आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त श्री. अर्जुन जयराम न्याहळदे सर यांचे पुतणे आहेत जैताणे धनगर समाज बांधवांकडून सत्कार व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आले

पत्रकार संरक्षण कायद्याची होणार होळी

साक्री तालुका प्रेस क्लबचा जाहीर पाठिंबा

साक्री । प्रतिनिधी

पाचोरा येथील पत्रकार संदीप महाजन यांना आमदार किशोर पाटील यांनी दिलेल्या अर्वाच्च शिव्या आणि नंतर त्यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा निषेध करण्यासाठी येत्या १७ ऑगस्ट २२ रोजी मुंबईसह राज्यभर निदर्शने करून पत्रकार संरक्षण कायद्याची होळी करण्याचा निर्णय मुंबईत झालेल्या ११ पत्रकार संघटनांच्या बैठकीत घेण्यात आला आहे. त्या अनुषंगाने साक्री तहसील कार्यालय येथे साक्री तालुका प्रेस क्लबचे सर्व पदाधिकारी पत्रकार संरक्षण कायद्याची होळी करणार आहेत.

बैठकीच्या आरंभी पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे राज्य निमंत्रक एस.एम. देशमुख यांनी पाचोऱ्यातील घटनेची सविस्तर माहिती देऊन सर्व पत्रकार संघटनांनी एकत्र येऊन आमदाराच्या दादागिरीच्या विरोधात आवाज उठविला पाहिजे असा आग्रह धरला. तेव्हा सर्व उपस्थित संघटनांच्या प्रतिनिधींनी त्यास संमती दर्शवत १७ ऑगस्ट रोजी राज्यभर निदर्शने करून पत्रकारांचे संरक्षण करण्यास निष्प्रभ ठरलेल्या पत्रकार संरक्षण कायद्याची होळी करण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी उपस्थित सर्वच संघटनांच्या प्रतिनिधींनी किशोर पाटील यांच्या अरेरावीचा निषेध करीत किशोर पाटील यांच्या विरोधात पत्रकार संरक्षण कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. सुसंस्कृत महाराष्ट्रात कायदे मंडळाचा एक सदस्यच कायदा हातात घेऊन आपल्या असंस्कृतपणाचे दर्शन घडवतो, आणि वरती होय मीच शिव्या दिल्या, काय करायचं ते करा अशी मस्तवाल भाषा वापरतो हे चिंताजनक, संतापजनक आणि किळसवाणे असल्याने त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी मुंबई येथे मुख्यमंत्री,गृहमंत्री आदिंना संयुक्त निवेदनाव्दारे करण्यात आली आहे. साक्री तहसील कार्यालयासमोर साक्री तालुका प्रेस क्लब व मराठी पत्रकार संघ साक्रीचे पदाधिकारी दि.१७ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी ११ वाजता पत्रकार संरक्षण कायद्याची होळी करण्यात येणार आहे.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र

शहीद वीरांचे नाव शिलाफलकावर नमूद केल्याने जुन्या इतिहासाला उजाळा मिळेल : जिल्हाधिकारी

धुळे ।

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त देशासाठी बलिदान दिलेल्या शहीद वीरांचे नाव प्रत्येक गावातील शिलाफलकावर नमूद केल्याने जुन्या इतिहासाला उजाळा मिळेल असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी केले.'मेरी माटी, मेरा देश' अर्थात 'माझी माती, माझा देश' या अभियानातंर्गत आज धुळे तालुक्यातील कापडणे येथे कार्यक्रम संपन्न झाला, यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास खासदार डॉ.सुभाष भामरे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश मोरे, प्रदीप पवार, जिल्हा परीषद सदस्य किरण पाटील, पंचायत समितीचे उपसभापती देवेंद्र माळी, पंचायत समिती सदस्य राजेंद्र पाटील, सरपंच सोनीबाई भिल, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य प्रमोद पाटील, स्वातंत्र्य सैनिक पत्नी केशरबाई भामरे, कमलबाई माळी, माजी कृषी सभापती अरविंद जाधव, सहायक गट विकास अधिकारी आर. डी. वाघ आदी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी श्री. गोयल म्हणाले, स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त देशभरात 'मेरी माटी, मेरा देश' हे विशेष अभियान सुरु आहे. या निमित्ताने जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये स्वातंत्र्य सैनिकांची व शहिद जवानांची नावे शिलाफलकावर लावण्यात येणार आहे. ही नावे शिलाफलकावर लावण्यात आल्याने येणाऱ्या नवीन पिढीला इतिहासाची माहिती मिळून त्यांच्यात देशभक्तीची भावना निर्माण होईल. आजचा विद्यार्थी हा मोबाईलचा वापर सकारात्मक कामासाठी करण्याबरोबरच विद्यार्थ्यांनी वाचनाकडे व खेळाकडे अधिक लक्ष देण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

संकलन : दिपक वाघ

दैनिक
लक्ष महाराष्ट्र

स्वातंत्र्यदिनी काढलेल्या रॅलीने वेळे धुळेकरांचे लक्ष

धुळे । वंदे यंदाचा स्वातंत्र्यदिन धुळेकरांसाठी अविस्मरणीय ठरला. कारण भाजपाचे धुळे महानगराध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांनी काढलेल्या मोटारसायकल रॅलीने यंदा गर्दीचे सर्व रेकॉर्ड मोडले. पदभार घेतल्यानंतर त्यांच्या नेतृत्वात पहिल्यांदाच अशी भव्यदिव्य मोटारसायकल रॅली निघाल्याने त्यांची लोकप्रियता, संघटन क्षमता व भाजपाची ताकदही यातून दिसून आली. विशेष म्हणजे या रॅलीत तिरंगा ध्वजही मोठ्या प्रमाणात दिसले. डीजेवरील देशभक्तीपर गितांच्या तालावर मार्गस्थ होणार्या या रॅलीने अवघे शहर तिरंगामय झाले होते. सोबतच भारत मातेचा जयघोषही प्रत्येकात देशभक्तीचे स्फुरण चेतवत होता. धुळे महानगराध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांनी आयोजित केलेल्या या मोटारसायकल रॅलीत भाजपाच्या नेत्यांसह लोकप्रतिनिधींही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. त्यात उत्तर महाराष्ट्र ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष विजय चौधरी, खासदार डॉ. सुभाष भामरे, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, महापौर प्रतिभाताई चौधरी, जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, नगरसेवक अमोल मासुळे, माजी महापौर चंद्रकांत सोनार, जयश्रीताई अहिरराव यांच्यासह भाजपाचे सर्व नगरसेवक, नगरसेविका, प्रदेश पदाधिकारी, जिल्हा पदाधिकारी, महिला मोर्चा, युवा मोर्चा सर्व आघाड्यांचे अध्यक्ष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पारोळा रोडवरील राम पॅलेस येथून काढण्यात आलेल्या रॅलीने गर्दीचे सारे रेकॉर्ड मोडल्याचे दिसून आले. स्वातंत्र्यदिनानिमित्त शहरात प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणात मोटारसायकल रॅली काढण्यात आली. या रॅलीत केवळ तरुणच नव्हेतर महिलांची संख्याही लक्षणीय होती. महिलांनी भगवे फेटे धारण करत व दुचाकीला तिरंगा ध्वज लावत रॅलीत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. त्यामुळे या रॅलीत सहभागी झालेल्या दुचाकींची लांबच लांब रांग लागली होती. ही रॅली ऐंशी फुटीरोड, लोकमान्य हॉस्पिटल, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, आग्रारोडमार्गे मोठा पूल, देवपूर परिसर, दत्तमंदिर चौक वडजाईरोडमार्गे स्टेडीयम, जयहिंद कॉलेजरोडमार्गे गणपती मंदिर, संतोषी माता चौक, मॉडर्न रोड, फाशीपूल, रेल्वेस्टेशन रोड, ऐंशीफुटी रोडवरुन पुन्हा राम पॅलेस येथे आली. या रॅलीने संपूर्ण शहर तिरंगामय झाले होते.

संकलन : दिपक वाघ